cmyk



दैनिक
# राज्य लोकतंत्र

गणपती बाप्पा मोरया

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१४२ | गुरूवार दि.१२ सप्टेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# महाराष्ट्रापाठोपाठ आता मध्य प्रदेशातही होणार एमएसपीवर सोयाबीन खरेदी

**पुणे। प्रतिनिधी**

**महाराष्ट्रासह तीन राज्यांना सोयाबीन एमएसपीवर खरेदी करण्यासाठी केंद्र सुरू करण्यासाठी मंजूरी दिली आहे. त्यानंतर आता मध्य प्रदेशच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र एमएसपीवर सोयाबीन खरेदी करण्यास कटिबद्ध असल्याचेही शिवराजसिंह चौहान यांनी म्हटले आहे. केंद्र सरकार मध्य प्रदेश सरकारच्या संपर्कात असून राज्य सरकार सोयाबीन खरेदी करू शकते अशा दोन योजना आहेत. त्यामुळेच लगेच परवानगी दिली आहे, असे ते म्हणाले.**



महाराष्ट्र आणि कर्नाटकपाठोपाठ आता मध्य प्रदेशातही सोयाबीनची किमान आधारभूत किंमतीवर (एमएसपी) खरेदी होणार आहे. मध्य प्रदेश सरकारने केंद्र सरकारकडे सोयाबीनच्या सरकारी खरेदीसाठी केंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव पाठवला होता. त्याला मंजुरी मिळाली आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी बुधवारी (दि.११) याबाबत माहिती दिली.

### अधिक उत्पादन असूनही मान्यता नव्हती...

**केंद्रीय कृषिमंत्रालय आणि सोयाबीन प्रोसेसर्स असोसिएशन ऑफ इंडिया (सोपा) च्या माहितीनुसार यंदाच्या हंगामात मध्य प्रदेशात ५३. ८०० लाख टन सोयाबीनचे उत्पादन झाले. महाराष्ट्रात सोयाबीनचे उत्पादन ५० लाख टन झाले होते. त्यानंतर गुजरात, छत्तीसगड आणि इतर राज्याध्ये सोयाबीनचे उत्पादन होते. पण सर्वाधिक सोयाबीनचे उत्पादन होणाऱ्या मध्य प्रदेशात सरकारी खरेदी केंद्र सुरू करण्यास केंद्राने परवानगी दिली नव्हती. तर महाराष्ट्र आणि कर्नाटकला परवानगी दिल्याने मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांनी आश्चर्य व्यक्त केले होते.**

त्यामुळे मध्य प्रदेशातही लवकरच सोयाबीनची शासकीय खरेदी सुरू होणार आहे. यावेळी शिवराज सिंह चौहान म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्राथमिकता कृषी आणि शेतकरी कल्याण आहे. अलीकडेच सोयाबीनचे भाव किमान आधारभूत किमतीच्या (एमएसपी) खाली घसरल्याने शेतकरी राज्यातील शेतकरी नाराज झाले होते. त्या नाराजीला मध्य प्रदेश सरकारला सामोरे जावे लागत होते. त्यामुळे राज्यात देखील महाराष्ट्र आणि कर्नाटक प्रमाणे सोयाबीन एमएसपीवर खरेदी करण्यासाठी केंद्र सुरू करावेत असा प्रस्ताव केंद्राकडे आला होता. तो प्रस्ताव केंद्राने मान्य ◀◀ पान ३ वर

# महाराष्ट्रात ११७ नव्या रस्त्यांना मंजुरी

### नवीन ७४५ किमीचे रस्ते बनणार

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाने महाराष्ट्रातील गावांच्या विकासासाठी पंतप्रधान ग्रामीण सडक योजनेअंतर्गत ११७ रस्त्यांच्या बांधकामाला मंजुरी दिली आहे. यासाठी मंत्रालयाने ६५५ कोटी ६६ लाख रुपये मंजूर केले आहेत. या योजनेंतर्गत महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये एकूण ७४५.२९ किलोमीटरचे रस्ते बांधण्यात येणार आहेत.**


केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार ग्रामीण भागात विकासाचा पाया मजबूत करण्यासाठी आणि रस्त्यांच्या सुविधा मजबूत करण्यासाठी कटिबद्ध आहे. या दिशेने ग्रामीण विकास मंत्रालयाने महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि केरळ या तीन राज्यांतील रस्त्यांना मंजुरी दिली आहे. योजनेअंतर्गत, मध्य प्रदेशसाठी ११३ कोटी ५८ लाख रुपये निधीचे १५२.४४ किमी लांबीचे एकूण ६० रस्ते मंजूर करण्यात आले आहेत. तसेच, केरळमध्ये ५५ कोटी २८ लाख रुपये निधीचे ११ पूल मंजूर करण्यात आले आहेत. ते म्हणाले की, विकास प्रत्येक गल्ली आणि गावापर्यंत पोहोचावा आणि रस्ते संपर्क वाढावा यासाठी केंद्र सरकार सतत काम करत आहे. महाराष्ट्रात, केंद्र सरकारने पंतप्रधान ग्राम सडक योजनेंतर्गत तीन टप्प्यांत ३३,७७१ किलोमीटरचे रस्ते बांधण्यास परवानगी दिली आहे. यामध्ये ३० हजार १७ किलोमीटरचे रस्ते तयार करण्यात आले आहेत.

# लोकसभेला जे झाले तेच ६ विधानसभा मतदार संघात होणार?

### सर्वच उमेदवार नावालाच राहणार; खरा सामना जरांगे फॅक्टर विरुध्द माधवं पॅटर्न







**बीड । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीमध्ये मनोज जरांगे पाटील आणि मुंडे बहिण भाऊ असाच सामना रंगला. लोकसभा निकालानंतर बीड जिल्ह्यामध्ये ओबीसी विरुद्ध मराठा असा संघर्ष पाहायला मिळाला. लोकसभेत जसे झाले तसेच आता बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघात होणार असल्याची संकेत आहेत. सर्वच विधानसभा मतदार संघातील उमेदवार हे नावालाच राहणार असून जरांगे फॅक्टर विरुद्ध माधव पॅटर्न अशाच लढती सर्व विधानसभा मतदारसंघात होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे अप्रत्यक्षरीत्या मनोज जरांगे पाटील विरुद्ध मुंडे बहिण –भाऊ असाच सामना रंगणार असल्याचे दिसून येत आहे.**

लोकसभा निवडणुकीमध्ये आष्टी केज आणि बीड विधानसभा मतदारसंघात मनोज जरांगे फॅक्टर प्रभावी ठरला. बजरंग सोनवणे यांना या तीनही मतदारसंघात आघाडी मिळाली. तर माजलगाव परळी आणि आष्टी विधानसभा मतदारसंघात पंकजा मुंडे यांना मताधिक्य मिळाल्याने या मतदारसंघांमध्ये माधव पॅटर्न चलती असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. लोकसभा निवडणुकीत ओबीसी उमेदवाराला मतदान करायचे नाही अशी भूमिका मराठा समाजाने घेतली होती. आता तीच भूमिका ओबीसी समाजाने विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घेतल्याचे समजते. ◀◀ पान ३ वर

### जरांगेसह मुंडेंची ही प्रतिष्ठापनाला

**बीड जिल्ह्यावर वर्चस्व मिळविण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या माध्यमातून मराठा समाज तर मुंडे बहीण भावाच्या ताकदीवर ओबीसी समाज जोरदार मोर्चे बांधणी करत आहेत. बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये ज्यांचे वर्चस्व राहील, त्यांचे आगामी काळात राजकारणाचा आलेख हा वाढता राहील, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही.**

### ॲड. सुभाष राऊत यांची भुमिका महत्वाची राहणार



**बीड जिल्ह्यात पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना मानणारा मोठा वर्ग आहे. बीड जिल्ह्यात त्यांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने असून राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष सुभाष राऊत हे त्यांचे कुटुंबातील सदस्य आहेत. सुभाष राऊत यांनी गेल्या ५ ते १० वर्षापासून बीड जिल्ह्यात ओबीसी समाजातील छोट्या जातींचे संघटन केल्याने आज त्यांच्या पाठीशी बहुतांश ओबीसी समाज आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील ६ मतदार संघात सुभाष राऊत यांच्या भुमिकेला महत्व राहणार आहे.**

### सगळ्यांसाठीच परीक्षेचा काळ

संपूर्ण महाराष्ट्राचे बीड जिल्ह्याकडे लक्ष आहे. राजकीय दृष्ट्या पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्याकडे वजनदार नेते म्हणून पाहिले जाते. तर मनोज जरांगे हे मराठा समाजाचे नेतृत्व करत असल्याने आजच्या घडीला चमत्कारिक नेतृत्व म्हणून ते उदयास आले आहेत. बीड जिल्हा हा या तिन्ही नेत्यांची मातृभूमी आहे, त्यामुळे आपलेच वर्चस्व राहावे यासाठी सर्वांनी मोर्चे बांधणी सुरू केली आहे. बीड जिल्हा हा मराठा आणि ओबीसी समाजाची समसमान ताकत असणारा असून मुंडे बहिण भावासह मनोज जरांगे यांच्यासाठी सुद्धा बीड जिल्ह्यातील येणाऱ्या काळात राजकारण करणे तेवढे सोपे नाही. ओबीसी आणि मराठा समाजाकडून एकमेकांवर कुरघोडीचे राजकारण करण्याचा पुन्हा पुन्हा प्रयत्न केला जाण्याची दाट शक्यता आहे.

# राहुल गांधी यांच्या अमेरिका दौऱ्यावरून भाजपाचा गोंधळ

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**काँग्रेस नेते राहुल गांधी हे सध्या अमेरिकेच्या दौऱ्यावर असून राहुल गांधी यांनी वादग्रस्त अमेरिकन महिला सिनेट मेंबर्स असलेल्या इल्हान उमर यांना भेटल्याबद्दल भाजपा नेत्यांकडून या भेटीवर टीकास्त्र सोडण्यात येत आहे. त्यामुळे राहुल गांधी यांचा दौरा अमेरिकेचा असला तरी त्याचे पडसाद भारतात उमटत आहेत.**

### महिला सिनेट सदस्य इल्हान उमर यांना भेटल्याबद्दल राग, काँग्रेसकडून पलटवार



सिनेट काँग्रेसच्या सदस्या इल्हान ओमर या भारत विरोधी भूमिकेसाठी ओळखल्या जातात. भारताविषयी असलेल्या विचारांचा ◀◀ पान ३ वर

### मणिपूरमधील तीन जिल्ह्यांत संचारबंदी, ५ जिल्ह्यांत इंटरनेट बंद

**नवी दिल्ली। वृतसंस्था**

मणिपूरमध्ये पुन्हा एकदा हिंसाचाराचे सत्र सुरु झाले आहे. राज्यातील काही ठिकाणी नुकत्याच झालेल्या ड्रोन हल्ल्यांतील दोषींवर कारवाई करावाईच्या मागणीसाठी आंदोलन सुरु आहे. मागील आठवड्यापासून सुरु असलेल्या हिंसाचारात आतापर्यंत १२ जण ठार झाले आहेत. तीन जिल्ह्यांमध्ये संचारबंदी लागू केली आहे. तसेच पाच जिल्ह्यांमध्ये पाच दिवस इंटरनेट सेवा बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. नुकत्याच झालेल्या ड्रोन हल्ल्यांतील दोषींवर कारवाई करा, अशी मागणीसाठी विद्यार्थी आंदोलन करत आहेत.विविध शाळा आणि महाविद्यालयांतील शेकडो विद्यार्थ्यांनी सोमवारी इम्फाळमधील खवैरामबंद येथे आंदोलन केले होते. गेल्या आठवड्यात १२ जणांच्या मृत्यूनंतर मणिपूर राज्यातील तणाव कायम आहे.

# रात्रीची भेट घेताच कशाला?

### लक्ष्मण हाके मंत्री मुंडेंवर संतापले

**जालना । प्रतिनिधी**

**ओबीसीतून मराठ्यांना आरक्षण हवे, यासाठी राज्यात संघर्ष सुरू आहे. ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी संघर्ष उभारणारे मंत्री छगन भुजबळांनंतर लक्ष्मण हाके यात आघाडीवर आहेत. अशातच कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी मराठा आरक्षणासाठी लढा उभारणारे मनोज जरांगेंची मध्यरात्रीनंतर घेतलेल्या भेटीवर लक्ष्मण हाके संतापले आहेत.**



**मनोज जरांगेंना लोक रात्रीच का भेटतात याबाबत जाहीर खुलासा त्यांनी केलाच पाहिजे. ओबीसी आरक्षण बचावासाठी आम्ही संघर्ष उभा केल्याने या भेटीचे कारण आम्हाला समजलेच पाहिजे, अशा शब्दांत लक्ष्मण हाके यांनी या भेटीला फटकारले आहे.**

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी काही दिवसांपूर्वी अंतरवाली सराटी येथं मनोज जरांगे यांची मध्यरात्रीनंतर भेट घेतली. आता या भेटीवर ओबीसी आरक्षणासाठी राज्यभर संघर्ष करणारे लक्ष्मण हाके संतापले आहेत. हाके म्हणाले, मनोज जरांगे यांना लोक रात्रीचे का भेटतात? ही भेट कशासाठी होती, ◀◀ पान ३ वर

### बीडचा अविनाश साबळे 'डायमंड लीग' फायनलसाठी पात्र

**ब्रुसेल्स । वृतसंस्था**

भारताचा धावपटू बीडचा अविनाश साबळे पहिल्यांदाच डायमंड लीगच्या अंतिम फेरीत सहभागी होणार आहे. या लीगच्या अंतिम फेरीत पोहोचणारा तो दुसरा भारतीय ठरला आहे. त्याच्या आधी भाला फेकपटू नीरज चोप्रा या स्पर्धेसाठी पात्र ठरला होता.

२९ वर्षांचा अविनाश ३००० मीटर स्टीपलचेस स्पर्धेत भारतीय आव्हान सादर करेल. त्यांचा ◀◀ पान ३ वर



### कोलकता बलात्कार आणि हत्या प्रकरणी मिथुनदा रस्त्यावर

**कोलकाता । वृतसंस्था**



पश्चिम बंगाल येथील कोलकातामध्ये शासकीय रुग्णालयातील (आरजी कर वैद्यकीय महाविद्यालय) प्रशिक्षणार्थी डॉक्टर (पीजी, द्वितीय वर्ष) युवतीवर बलात्कारानंतर तिची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी संपुर्ण देशामध्ये तीव्र निदर्शने सुरु आहेत. याबरोबरच सर्वोच्च ◀◀ पान ३ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१० सप्टेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १.५० क्विंटल | २,६१० | २,९०० | २,७५५ |
| ज्वारी/हायब्रिड :१२८.०० क्विंटल | २,१२८ | २,७११ | २,२६१ |
| मूग : ४८.५० क्विंटल | ६,१०१ | ८,००० | ७,२४७ |
| तूर : ०.५० क्विंटल | ५,००१ | ५,००१ | ५,००१ |
| उडीद : १४०.०० क्विंटल | ४,६०१ | ७,१८० | ६,१८१ |
| बाजरी: २७.५० क्विंटल | २,४०१ | २,७५० | २,५५६ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १९४.५० क्विंटल | ४,५५० | ४,६२५ | ४,५७७ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ६,१०० | ६,७५० | ६,४२५ |

# अध्यक्ष, संचालकांची मालमत्ता लिलाव करण्याची अट शिथिल

### सहकार खात्याचा आपल्याच निर्णयावरून युटर्न

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील आर्थिक अडचणीतील असलेल्या सहकारी साखर कारखान्यांना राज्य सरकार हमीवर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून कर्ज उपलब्ध करून देत असते. ते कर्ज वसुल करण्यासाठी संचालक मंडळाच्या वैयक्तित मालमत्तेवर कर्जाचा बोजा चढवण्यासह मालमत्तेचा लिलाव करण्याचे अधिकार बँकेला देण्यात आले होते. पण आता ही अटच शिथिल करण्याची वेळ शासनावर आली आहे. याबाबत सहकार, पवन व वस्त्रोद्योग विभागाने नुकताच शासन निर्णय काढला आहे.**

राज्यातील आजारी सहकारी साखर कारखान्यांना राज्य सहकारी बँकेकडून शासन हमीवर कर्ज दिले जाते. त्या कर्जाची व्याजासह परतफेड करण्यासाठी साखर कारखान्यांचे संचालक वैयक्तिकरित्या जबाबदार असतील आणि ते वसूल करण्यासाठी त्यांची मालमत्ता संलग्न करता येईल. तसेच संचालकांना कायदेशीर बाबींची पूर्तता करून बंधपत्र देण्याचे धोरण ठरवण्यात आले होते. ◀◀ पान ३ वर






cmyk

## अग्रलेख

# तिसरी आघाडी झालीच तर परिणाम निश्चीत

महाराष्ट्राच्या विद्यमान राजकारणामध्ये सत्ताधारी महायुती आणि विरोधी बाकावर बसलेली महाविकास आघाडी यांच्यामध्ये राजकीय ध्रुवीकरण झाले असतानाच राज्यामध्ये तिसरी आघाडी निर्माण करून मतदारांना अजून एक पर्याय उपलब्ध करून देण्याबाबत हालचाली सुरू आहेत. देशाच्या राजकारणाला तिसरी आघाडी हा प्रकार नवा नाही. ही चर्चा फक्त माध्यमांमध्ये नाही, तर या तिसऱ्या आघाडीचा भाग होऊ पाहणाऱ्या काही नेत्यांनी सुद्धा स्पष्टपणे तसे संकेत दिले आहेत.

कोल्हापूरचे संभाजीराजे छत्रपती यांची स्वराज्य संघटना आणि प्रहार संघटनेचे बच्चू कडू, शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी यांच्या पुढाकाराने हा तिसऱ्या आघाडीचा प्रयोग रंगण्याचे संकेत मिळत आहेत. काही दिवसांपूर्वी संभाजीराजे छत्रपती यांनी जालना येथे जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली होती. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी अत्यंत स्पष्ट शब्दामध्ये तिसाऱ्या आघाडीचा आमचा विचार सुरू असून त्यामध्ये मनोज जरांगे येतात का याची चाचपणी करण्यासाठी आम्ही आलो होतो, असे सांगितले होते. गेल्या वर्षभराच्या कालावधीपासून मराठा आरक्षणासाठी लढणारे मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी आरक्षण मागणी मान्य नाही झाली तर सत्ताधारी आघाडीच्या आमदारांना विधानसभा निवडणुकीत पाडण्याची धमकी दिलीच आहे. शिवाय अधूनमधून ते सक्रिय राजकारणात उतरण्याची घोषणाही करत असतात. दुसरीकडे अद्यापही महायुतीचा भाग असलेल्या पण नाराज असलेल्या बच्चू कडू यांचा महायुतीबाबत भ्रमनिरास झाल्याने त्यांनीसुद्धा तिसरी आघाडी करण्याबाबत सूतोवाच केले आहे. शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनाही महाविकास आघाडी असो किंवा महायुती असो यांच्याबाबत कोणतीही सहानुभूती नसल्याने त्यांनीही तिसऱ्या आघाडीमध्ये सहभागी होण्याबाबत अनुकूलता दर्शवली आहे. सध्या तरी तिसऱ्या आघाडीचा पर्याय म्हणून हे सर्व नेते समोर दिसत असले, तरी नजीकच्या कालावधीमध्ये प्रकाश आंबेडकर यांचा वंचित विकास आघाडी किंवा एमआयएम या पक्षांनासुद्धा तिसऱ्या आघाडीमध्ये सहभागी केले जाऊ शकते. मनोज जरंगे पाटील तिसऱ्या आघाडीचा भाग होणार असतील तर मी त्या आघाडीत सामील होणार नाही, असे जरी प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्टपणे सांगितले असले तरी आजपर्यंतचा इतिहास पाहता त्यांची भूमिका बदलू शकते. एमआयएमच्या नेत्यांनी खरेतर आपल्याला महाविकास आघाडीमध्ये स्थान मिळावे अशी अपेक्षा व्यक्त केली होती. पण महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून त्याबाबत अद्याप कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने हा पक्षसुद्धा तिसऱ्या आघाडीचा पर्याय निवडू शकतो. तिसऱ्या आघाडीचे यावेळचे हे प्रयत्न निश्चितच ठाम आणि गंभीर असल्याची जाणीव राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनाही झाली असल्यानेच त्यांनी छोट्या छोट्या पक्षांना महाविकास आघाडीमध्ये सामील केले जावे अशी भूमिका घेतली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये गेल्या काही कालावधीमध्ये जे राजकीय ध्रुवीकरण झाले आहे आणि त्यानिमित्ताने जो काही राजकीय गोंधळ वाढीस लागला आहे त्यामध्ये जर मतदारांना अजून एक पर्याय उपलब्ध झाला, तर कदाचित मतदार तसा पर्याय निवडू शकतात ही जाणीव शरद पवारांसारख्या महाराष्ट्रातील अनेक नेत्यांना असणार आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिसरी आघाडी जर निर्माण झाली तर त्याचा सर्वात जास्त फटका महायुतीपेक्षाही महाविकास आघाडीलाच बसणार आहे, हे उघड आहे. या व्यतिरिक्त राज्यात तिसऱ्या आघाडीचा भाग न होणारे जे इतर पक्ष आहेत किंवा अधिकृत उमेदवारी जाहीर झाल्यानंतर उमेदवारी न मिळाल्यामुळे बंडखोरी करणारे काही अपक्ष उमेदवारही असणार आहे. याचाही विचार या प्रमुख आघाड्यांना करावा लागणार आहे. राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र नवनिर्माण सेना असो किंवा आम आदमी पार्टी असो असे काही पक्ष तिसऱ्या आघाडीत न येतासुद्धा एखाद्या आघाडीचा खेळ बिघडवू शकतात याची जाणीव अनेक नेत्यांना आहे. राज्यातील राजकारणाचे ध्रुवीकरण झाल्याच्या कालावधीमध्ये राज्यातील डाव्या पक्षांकडे सर्वांचेच दुर्लक्ष झाले आहे. तिसऱ्या आघाडीचा प्रयोग प्रत्यक्षात आला, तर डावे पक्षसुद्धा या आघाडीमध्ये सहभागी होऊ शकतात आणि त्याचाही मोठा परिणाम विधानसभा निवडणूक निकालावर होऊ शकतो.

## आज मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात डोंगरकिन्ही येथील ग्रामस्थ विद्यार्थ्यांची भरवणार शाळा

**अंमळनेर । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही येथील जिल्हा परिषद शाळेला इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या वर्गाला गणित व विज्ञान विषयाचा शिक्षक व शाळेला शिपाई नाही. शिक्षक व शिपायाची त्वरित नियुक्ती केली नाही तर, जि.प. मुख्यकार्यकारी अधिकारी बीड यांच्या दालनात विद्यार्थी बसवूत असे निवेदनातून ग्रामस्थांनी इशारा दिला होता. परंतु आज पर्यंत या शाळेला गणित व विज्ञान विषयाचा शिक्षक व शिपाई उपलब्ध न झाल्याने आज दिनांक १२/०९/ २००२४ गुरुवार रोजी डोंगरकिन्ही येथील ग्रामस्थ संबंधित वर्गातील विद्यार्थी मुख्य कार्यकारी अधिकारी बीड यांच्या दालणात उपस्थित करून शाळा भरणार असल्याचे ग्रामस्थांनी कळविले आहे. निवेदनावर शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व बहुसंख्येने ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. अनेक वेळा याविषयी निवेदन व विनंती करून ही काहीच उपयोग झालेला नाही. शिक्षक व शिपाई नसल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. जोपर्यंत शिक्षक व शिपाई देत नाही तोपर्यंत विद्यार्थी व पालक आपल्या दालनात शाळा भरवणार यावर ग्रामस्थ ठाम आहेत.

## जाधववाडी येथील शाळेच्या इमारतीला पावसाच्या पाण्याने गळती ;इमारत दुरुस्तीची ग्रामस्थांची मागणी

**अंमळनेर । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळा अंतर्गत जाधववाडी येथील शाळा इमारतीला पावसाच्या पाण्याने गळती लागल्याने शाळा इमारत विद्यार्थ्यांसाठी बसण्यास धोकादायक बनली असून शाळा इमारतीची लवकरात लवकर दुरुस्ती करून विद्यार्थ्यांच्या जीवितास भविष्यात होणारा धोका टाळावा असे जाधववाडी येथील ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. बीड, गटशिक्षणाधिकारी, गटविकास अधिकारी पंचायत समिती पाटोदा यांना दि. ६ सप्टेंबर २०२४ रोजी लेखी निवेदन देऊन कळविले आहे. त्यांनी निवादनातून म्हटले आहे की, शाळा इमारतीच्या स्लॅबला चिरण्यापडून, भेगा पडून इमारत पूर्ण गळत आहे. शाळा खोलीत सर्वत्र पाणी साचून विद्यार्थ्यांना बसण्यास पाणी साचल्याने जागाच राहत नाही. त्यामुळे शाळेची इमारत धोकादायक बनली असल्याने त्वरित दुरुस्ती होणे गरजेचे आहे. स्लॅप कच्चा असल्याने स्लॅप कोसळण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे ज्ञानार्जन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका आहे. शाळा इमारतीला गळती लागल्याने पालक वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळेत आपल्या पाल्यांना पाठवावे की, नाही त्यांच्यात संभ्रम निर्माण झाला आहे. शाळा गळायला लागली तर विद्यार्थ्यांना इतर ठिकाणी बसण्याची वेळ आली आहे.

## ज्येष्ठ नागरिकांनी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेचा लाभ घ्यावा-आ.बबनराव लोणीकर

**जालना । प्रतिनिधी**

**ज्येष्ठांना देशातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्राची मोफत यात्रा करण्यासाठी ''मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना भारतातील एकूण ७३ व महाराष्ट्र राज्यातील ६६ तीर्थक्षेत्रांचा योजनेमध्ये समावेश प्रवास खर्चासाठी प्रतिव्यक्ती ३० हजार रुपये राज्य सरकार देणार वय वर्षे साठवरील ज्येष्ठ नागरिक मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना करीता पात्र राहणार आहे. ७५ वर्षांवरील अर्जदाराला त्याच्या जीवनसाथी किंवा सहाय्यक यापैकी एकाला सोबत नेण्याची परवानगी राहणार आहे.**



महाराष्ट्र राज्यातील सर्व धर्मीयांमधील ६० वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना शासनाने मोठी आनंदाची योजना आणली आहे. ज्येष्ठांना देशातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्राची मोफत यात्रा करण्यासाठी ''मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना'' राबवण्याचे नुकतेच राज्याचे मुख्यमंत्री यांनी घोषित केले आहे. परतूर विधानसभा मतदारसंघातील ज्येष्ठ नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे. भारतातील एकूण ७३ व महाराष्ट्र राज्यातील ६६ तीर्थक्षेत्रांचा योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. जवळपास देशातील व राज्यातील सर्व महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे. देशातील मोठ्या तीर्थ यात्रांना जाऊन मनःशांती तसेच अध्यात्मिक पातळी गाठणे सुखकर व्हावे, यासाठी राज्यातील सर्व धर्मीयांमधील ज्येष्ठ नागरिकांना भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची, दर्शनाची संधी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेच्या माध्यमातून मिळणार राज्यातील व भारत देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रांचा समावेश करण्यात आला असून, सदर योजनेअंतर्गत निर्धारित तीर्थक्षेत्रापैकी एका यात्रेकरिता पात्र व्यक्तीला या योजनेचा एक वेळ लाभ मिळणार आहे, तसेच प्रवास खर्चासाठी कमाल मर्यादा प्रतिव्यक्ती ३० हजार रुपये इतकी राहणार आहे. यामध्ये प्रत्यक्ष प्रवास, भोजन, निवास इत्यादी बाबींचा समावेश असेल. लाभार्थीचे वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजार असावे. लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व वय वर्षे साठवरील ज्येष्ठ नागरिक असावा. अशी माहिती महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांच्या कार्यालयातून प्रसिद्धी देण्यात आलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे. या पत्रकात पुढे म्हटले आहे की सदर योजनेचा लाभ मिळविण्या साठी ऑनलाईन अर्ज सादर करावे लागणार आहेत. सदर योजनेअंतर्गत विविध दळणव- ळणाच्या साधनांद्वारे प्रवासाचे आयोजन करण्यासाठी अधिकृत टुरिस्ट कंपन्या तसेच किंवा समकक्ष अधिकृत असलेल्या अधिकृत कंपन्यांची निवड विहित नियमांचे निविदा प्रक्रियेचे पालन करून करण्यात येणार आहे. प्रवाशांची निवड जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीद्वारे करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात कोटा निश्चित करण्यात येऊन प्राप्त झालेल्या अर्जाच्या उपलब्धतेनुसार लॉटरीद्वारे प्रवाशांची निवड करण्यात येणार आहे. ७५ वर्षांवरील अर्जदाराला त्याच्या जीवनसाथी किंवा सहाय्यक यापैकी एकाला त्याच्यासोबत नेण्याची परवानगी असणार आहे.

## विकास कामांसाठी प्राधान्याने निधी उपलब्ध करून देणार-आ.कैलास गोरंटयाल

**जालना । प्रतिनिधी**

**खुल्या जागेच्या सुशोभीकरण, संरक्षण भिंतीसह विकासाच्या अन्य कामांना प्राधान्य देण्यात येईल अशी ग्वाही आ. कैलास गोरंट्याल यांनी काल मंगळवारी येथे बोलतांना दिली.**

जालना शहरातील अंबड चौफुली परिसरातील महेश नगर गणेश मंडळ आणि राजपूत वाडी येथील श्रीची आरती आ.कैलास गोरंटयाल यांच्या हस्ते करण्यात आली. या आरतीनंतर परिसरातील रहिवाशी नागरिकांनी विकास कामांसाठी साकडे घातल्यानंतर त्यांनी उपरोक्त ग्वाही दिली.यावेळी अंबड चौफुली प्रभागातील नागरिकांनी अंबड रोड ते अंतर्गत गंगाधरवाडी - सामंनगाव रोडची मागणी पूर्ण करून दर्जेदार काम करून दिल्याबद्दल आ. गोरंटयाल यांचा सत्कार करून आभार व्यक्त करत यापुढील काळात देखील प्रभागातील सर्व नागरिक आपल्या पाठीशी भक्कमपणे उभा राहिल अशी ग्वाही दिली. स्थानिक रहिवाशांनी केलेल्या मागणीनुसार सामनगाव रोडवर पथदिवे



आणि एक मोठे हॅलोजन लाईट तसेच महेश नगर कॉलनी मधील खुल्या जागेचे सुशोभीकरण, वॉल कंपाऊंड, एक सभा मंडप, महादेवाची मूर्ती स्थापनेसाठी लवकरच आमदार किंवा खासदार निधीतून पैसा उपलब्ध करून दिला जाईल आणि महादेवाच्या मूर्तीसाठी आपल्याकडून जी मदत होईल ती लगेच करण्यास तयार असल्याचे उपस्थीत नागरिकांना आश्वासित केले. यावेळी धर्मा खिल्लारे, राम सावंत, योगेश पाटील, बापू साळवे, शेख इब्राहिम, नंदाताई पवार, शेख इम्रान, गणेश चांदोडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सूत्रसंचालन युवा काँग्रेसचे गजानन ठोंबरे यांनी केले. यावेळी विठ्ठलराव ठोंबरे, जायभाये,दामोदर वाघमारे, किंगरे, साखरे, काळुसे, जनार्दन गजर, मुंढे, विनोद राठोड, सावता वाघमारे, गोरख किंगरे, गोपाल ठोंबरे, गजानन राजपूत, परमेश्वर वाघमारे, परमेश्वर शेरकर, राजू राठोड, कासंडे, घुगे, राजू अंभोरे, नितेश पंचलोटे, कैलास चव्हाण, अरुण झिंजुर्डे, नागरे, दत्ता माकोडे, काळे, सुभाष गोरे, सचिन वाघ यांच्यासह परिसरातील रहिवाशी, महिला युवक कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तत्काळ नुकसान भरपाई द्या

## जिल्हा काँग्रेसकडून राज्यपाल यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी**

**काँग्रेस पक्षाचे शिष्टमंडळ जिल्हाध्यक्ष, खा.डॉ.कल्याण काळे यांच्या नेतृत्वाखाली मा. आ.नामदेव पवार, शहर काँग्रेस अध्यक्ष शेख युसूफ, सेवादल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष विलास औताडे व जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष किरण पा.डोणगांवकर यांनी मंगळवारी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांची भेट घेतली. यावेळी पीककर्जाचे उद्दिष्ट पूर्ण ना करणाऱ्या बँकांवर कारवाई करावे तसेच अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झाल्याने त्यांना तत्काळ नुकसान भरपाई मिळण्यासह विविध मागण्यांचे निवेदन राज्यपाल राधाकृष्णन यांना देण्यात आले.**

२०२३-२४ वर्षात छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिक विमा रक्कम देण्यास टाळाटाळ करणाऱ्या विमा कंपनीवर कठोर व दंडात्मक कारवाई करण्यात यावे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १०९१६७७ शेतकऱ्यांनी ५२५१०९.१० हेक्टर क्षेत्राचा विमा भरला होता. शेतकरी, राज्यसरकार व केंद्र सरकार मिळुन ३९६.६७ कोटी रक्कम भरलेली आहे. परंतु १०९१६७७ शेतकऱ्यांपैकी फक्त ६८१२०० एवढेच शेतकरी पात्र ठरविले. त्याची रक्कम ही २२१.४८ कोटी आहे. जालना जिल्ह्यात ८७७१३४ शेतकऱ्यांनी ५११९३२.०२ हेक्टरचा विमा भरलाा होता. त्यासाठी शेतकरी, राज्यसरकार, केंद्र सरकार मिळुन ४७१.८१ कोटी एवढी मोठी रक्कम विमा कंपनीला भरलेली आहे. ८७७१३४ शेतकऱ्यांपैकी फक्त ५६८२१६ शेतकरी पात्र ठरविले आणि त्याची रक्कम २४६.४७ कोटी आहे. छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची तात्काळ भरपाई देण्यात यावे.छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यात अतिवृष्टी झालेली आहे. त्यामुळे शेती पिकांसह, विहीरी, शेततळे अशा अनेक बाबींचे नुकसान झालेले आहे. काही ठिकाणी पाझर तलाव, साठवण तलाव फुटून नुकसान झालेले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मागील वर्षी जुन-सप्टेंबर या कालावधीत ४४८.९ एमएम पाऊस झाला होता तर यावर्षी ६७९.५ एमएम इतका मोठ्या प्रमाणात पाऊस झालेला आहे. जालना जिल्ह्यात मागील वर्षी ५०३ एमएम इतका पाऊस झाला होता तर यावर्षी ७३१ एमएम इतका पाऊस झालेला आहे. छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगामाचे पिक कर्ज देण्याचे लाक्षांक पुर्ण न करणाऱ्या बँकांवर कठोर कारवाई करण्यात यावे. छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यात शेतकऱ्यांना पिक कर्ज देण्यास बँकांकडुन टाळाटाळ करण्यांत येत आहेत. थकीत कर्जदार आणि ज्यांचे सिबील खराब आहे अशा शेतकऱ्यांना देखील पिककर्ज देण्याचे आदेश शासनाने दिलेले असतांना बँकांनी दिलेला लाक्षांक पुर्ण केलेला नाही. त्यामुळे अनेक शेतकरी हवालदिल झाले असून, खाजगी सावकारांकडुन कर्ज घेऊन शेतीचा खर्च भागवित आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्हाचा सन २०२४-२५ चा लाक्षांक १५५४.२८ कोटीचा असतांना फक्त १०८०.१७ कोटीचा लाक्षांक पुर्ण केलेला आहे म्हणजेच फक्त ६९.५० टक्केच कर्ज वितरण झालेले आहे. जालना जिल्ह्यातील



लाक्षांक १८०४ कोटीचा असतांना फक्त ५६१.५८ कोटीचा लाक्षांक पुर्ण केलेला आहे म्हणजेच फक्त ३१.१३ टक्केच कर्ज वितरण झालेले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील डीएमआयसीमध्ये मोठे प्रकल्प / उद्योग देण्यात यावे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करून १०-१२ वर्ष गेलेली आहेत. परंतु अद्यापपर्यंत मोठे प्रकल्प / उद्योग या भागात आलेले नाहीत. रोजगार निर्मिती होऊन बेरोजगारांना रोजगाराची संधी मिळेल या आशेकडे डोळे लाऊन बसलेले अनेक तरूण शैक्षणिक पात्रता असतांना देखील बेरोजगार बसलेले आहेत. शेंद्रा येथील २००० एकर जमीन संपादित केलेली आहे. प्रत्यक्षात फक्त १२० एकरवर प्रकल्पासाठी देण्यांत आलेली आहे. बिडकीन येथील २५२३ एकर जमीन संपादित करण्यांत आली आणि ५४० एकर जमीन प्रकल्पांसाठी देण्यांत आलेली आहे. जालना येथील ड्रायपोर्ट चे काम बंद असल्याचे निदर्शनातआले आहे तेही काम सुरू करण्यात यावी .जालना जिल्ह्यात ड्रायपोर्टचे काम अनेक दिवसापासून प्रलंबित आहे. संथ गतीने चालु आहे. त्यामध्ये प्रगती होतांना दिसत नाही. ड्रायपोर्ट करण्याचा निर्णय जुलै २०१५ मध्ये घेण्यांत आला. भुसंपादनाची कारवाई सन २०१६-१८ या कालावधीत करण्यांत आली. १९१ हेक्टर जमीन संपादित करण्यांत आली. भूसंपादनासाठी १०७ कोटी खर्च करण्यांत आला. मागील ७ वर्षापासून ड्रायपोर्ट करण्यासाठी १३८ कोटी खर्च करण्यांत आला. वारंवार कार्यान्वित यंत्रणा बदलण्यांत आली आहे. पोर्टकडुन नॅशनल हायवे ला काम देण्यांत आले. राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ सोलापुर-धुळे रस्त्यावरील कन्नड येथील औट्रम घाटातील बोगदा कामास निधी उपलब्ध करून देण्यात यावे . राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ सोलापुर-धुळे रस्त्यावरील कन्नड येथील औट्रम घाटातील बोगद्याच्या कामात मागील १० वर्षापासून दिरंगाई चालु असून, शासनाच्या कोट्यावधी रूपयाचे नुकसान झालेले आहे. सन २०१४ मध्ये महामार्गाचे काम सुरू केले. सन २०१६-१७ ला बोगद्याचा डी.पी.आर. मंजुर करण्यांत आला. अंबरीश कंपनीने बोगदा योग्य असल्याचा अहवाल देखील त्याच वेळी दिला. परत आता नव्याने डीपीआर बनविण्याचा घाट घातला जात आहे. त्यामुळे पुन्हा वेळ आणि पैसा खर्च होणारा आहे.परंतु वेळे बोगदा न बनविल्यामुळे १४ कि.मी. अंतराची वाहतुक ५० कि.मी. अंतरावरून करावी लागत आहे. त्यामुळे इंधन आणि आर्थिक भुर्दंड सर्वसामान्यांना सहन करावा लागत आहे.

## पान १वरून...

### महाराष्ट्रापाठोपाठ आता

केला आहे. शेतकऱ्याच्या घामाची पूर्ण किंमत दिली जाईल, अशी ग्वाही शिवराज सिंह चौहान यांनी दिली आहे. सोयाबीनचे दर ३५०० ते ४००० रुपये प्रतिक्विंटलपर्यंत पोहोचले होते. तर सध्या ४००० ते ४५०० रुपये प्रति क्विंटलपर्यंत दराने सोयाबीनची विक्री होत आहे. पण ती केंद्र सरकारने निश्चित केलेल्या एमएसपीपेक्षी कमी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना ४८९२ रुपये प्रतिक्विंटल दराने भाव मिळावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

-------

### लोकसभेला जे झाले तेच

काही झालं तरी मराठा उमेदवाराला मतदान करायचं नाही, असा चंग आता ओबीसी समाजाने बांधला आहे. बीड जिल्ह्यातील ६ मतदार संघातील सर्वच उमेदवार हे नावालाच राहणार असून जरांगे फॅक्टर विरुद्ध माधवं पॅटर्न असाच सामना रंगणार आहे. मराठा समाज ओबीसी उमेदवाराला मतदान करणार नाही तर ओबीसी समाज मराठा उमेदवाराला मतदान करणार नाही अशीच चर्चा सर्वत्र होताना दिसत आहे. परिणामी बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये मनोज जरांगे पाटील विरुद्ध मुंडे बहीण भाऊ अशाच लढती अप्रत्यक्षरीत्या होणार असल्याचे दिसते. त्यामुळे बीड जिल्ह्यावर कोणाचे वर्चस्व राहू शकते हे विधानसभा निकालानंतर कळेल, तत्पूर्वी विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून मराठा विरुद्ध ओबीसी रणसंग्राम पुन्हा एकदा पाहायला मिळेल असे दिसते. बीड जिल्ह्याबरोबर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी दोन्ही बाजूकडून जोरदार मोर्चे बांधणी करण्यात येत आहे. सक्षम उमेदवार आपल्या बाजूने यावा यासाठी तगडी फिल्डिंग लावली जात आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये चुरशीच्या लढती होतील असेच दिसते.

---------

### रात्रीची भेट घेताच

हे आता त्यांनी जाहीररित्या सांगितले पाहिजे. कारण आम्हाला समजले पाहिजे. तुम्ही संविधानाची शपथ घेतली. जरांगेकडे तुम्हाला का जावे लागले, कोण आहेत जरांगे? जो व्यक्ती, माणूस संविधानाच्या विरोधात आहे, ओबीसींची घरे जाळण्यासाठी सांगतो, ओबीसींना मतदान नाही करायचे म्हणतो, त्यांची भेट कशाला असे हाके म्हणाले.

------------

### राहुल गांधी यांच्या अमेरिका

विचार करताना काही भागांमध्ये त्यांच्यावर वैचारिक पक्षपातीपणा करत असल्याचा आरोपही करण्यात येतो. राहुल गांधी यांच्या तीन दिवसीय अमेरिका दौऱ्यात मंगळवारी भेटलेल्या अनेक अमेरिकन खासदारांमध्ये त्याही होत्या. या भेटीवरून भारतातील भाजपा नेत्यांकडून टीकेची झोड उठली. बुधवारी पत्रकार परिषदेला संबोधित करताना राज्यसभेचे खासदार आणि भाजपाचे प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी म्हणाले, राहुल गांधी हे भारतविरोधी विष पसरवण्यासाठी ओळखले जातात, परंतु यावेळी त्यांनी जे केले ते चिंताजनक आहे. अमेरिकेला भेटणारे ते पहिले विरोधी पक्षनेते ठरले. खासदार इल्हान, जे भारतविरोधी भूमिकेसाठी प्रसिध्द असलेल्या इल्हान ओमर यांची भेट घेतली. पुढे बोलताना सुंधाशू त्रिवेदी म्हणाले की, त्यांनी आपल्या भारतविरोधी मित्रांच्या यादीत आणखी एक नाव जोडले आहे. राहुल गांधी बालिशपणाने वागत नाहीत, तर धोकादायकपणे वागत आहेत अशी खोचक टीका करत राहुल गांधी हे भारत विरोधी भूमिका घेणाऱ्यांना आवडेल असेच वागत आहेत असा आरोपही त्यांनी केला. भाजपाचे प्रवक्ते शेहजाद पूनावाला देखील राहुल गांधी यांच्यावर टीका करताना म्हणाले की, राहुल गांधींना इल्हान ओमरला का भेटावे लागले? ते प्रत्येक परदेश दौऱ्यावर अत्यंत कट्टर भारतविरोधी घटकांशी का गुंतले आहेत? भाजपामध्ये देश विरोध ठीक आहे असा कुत्सित टोलाही यावेळी त्यांनी लगावला.

**काँग्रेसचा भाजपावर पलटवार**

काँग्रेसने या भेटीबाबत बोलताना स्पष्ट केले की, इल्हान ओमर हे राहुल गांधींना भेटलेल्या अमेरिकन शिष्टमंडळाच्या भाग होत्या. यासंदर्भात काँग्रेस नेते पवन खेरा यांनी भाजपाच्या टीकेला उत्तर देताना म्हटले की, भाजपाच्या नेत्यांनी पहिल्यांदा इल्हान उमरचे नाव ऐकले की काय. त्या एक काँग्रेस सिनेट सदस्य महिला आहेत आणि शिष्टमंडळाचा एक भाग म्हणून त्या भेटल्या. शीख समुदायावर गांधी वंशजांच्या टिप्पणीबद्दल बोलताना पवन खेरा म्हणाले की, राहुल गांधी यांनी शीखांच्या विरोधात कोणतेही वक्तव्य केलेले नाही. देशात द्वेष कसा आहे, एका वृद्धाला ट्रेनमध्ये कशी मारहाण करण्यात आली, मुस्लिम असल्याच्या संशयावरून एका मुलाची कशी हत्या झाली, असे विविध समुदायांचे प्रश्न त्यांनी वारंवार मांडले आहेत. त्यानंतर मणिपूरमधील हिंसाचारावरून पवन खेरा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्यावर निशाणा साधताना म्हटले की, गृहमंत्री आणि पंतप्रधानांनी सोशल मीडियातून बाहेर पडून जमिनीवर यावे त्यांनी मणिपूरला देशाचा भाग मानतो की नाही, ते मणिपूरला भेट देणार की नाही याचे उत्तर त्यांनी द्यावे, असा सवाल खोचक टोलाही त्यांनी यावेळी लगावला.

-------

### कोलकता बलात्कार आणि

न्यायालयाने पश्चिम बंगालमधील डॉक्टरांना ड्युटीवर परत जाण्यासाठी फटकारले आहे. आता बॉलिवूड अभिनेते आणि भाजप नेते मिथून चक्रवर्ती हे सुद्धा पिडीत तरुणीला न्याय मिळावा यासाठी निदर्शनांमध्ये सहभागी झाले आहेत.

-------

### बीडचा अविनाश साबळ

इव्हेंट शुक्रवार, १३ सप्टेंबर रोजी होणार आहे. साबळेने या मोसमात ५ पैकी २ डायमंड लीग स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे आणि तो ३ गुणांसह १४ व्या स्थानावर आहे. पण, त्याच्यापेक्षा वरच्या क्रमांकावर असलेल्या ४ खेळाडूंनी आपली नावे मागे घेतली. यासह साबळे १२ खेळाडूंसह अंतिम फेरीसाठी पात्र ठरला. २ दिवस चालणारी डायमंड लीगची अंतिम फेरी ब्रुसेल्स येथे होणार आहे. विजेत्या ॲथलीटला प्रतिष्ठित डायमंड ट्रॉफी, ३०,००० डॉलर बक्षीस रक्कम आणि जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये वाइल्ड कार्ड एन्ट्री मिळते. तर उपविजेत्याला १२,००० डॉलर आणि ८ व्या स्थानावर असलेल्या फिनिशरला १,००० डॉलर मिळतात.

------------

### अध्यक्ष, संचालकांची मालमत्ता लिलाव

पण आता संचालक मंडळांच्या बाबतीत घेतलेली अटच शिथिल करण्यात आली आहे. वित्त विभागाने घातलेली अटच शासनाने मागे घेतली आहे. सहकार, पवन व वस्त्रोद्योग विभागाने १३ सप्टेंबर रोजी काढलेल्या शासन निर्णयात बदल केल्याचा नवा शासन निर्णय काढला आहे. सहकार, पवन व वस्त्रोद्योग विभागाने नव्या आदेशात मागील धोरणातील अट क्र. ८ वगळण्यात आल्याचे म्हटले आहे.

---------

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि. १२ सप्टेंबर २०२४



# शिवगर्जना गणेश मंडळाच्या वतीने ५१ रक्तदात्यांनी केले रक्तदान

किल्ले धारूर : धारूर शहरातील नवाजलेले गणेश मंडळ म्हणून शिवगर्जना गणेश मंडळ पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवलेजातात.या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम गणेश मंडळाच्या गणेश भक्तांकडून केले जाते ११ सप्टेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



शिवगर्जना गणेश मंडळ आयोजित भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिराला उद्घाटक म्हणून तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शहाजी लोमटे उपस्थित होते तसेच प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.राम शिनगारे डॉ.भागवत शिनगारे डॉ. संजय पूजदेकर डॉ. अरविंद नेते पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे सामाजिक कार्यकर्ते सादिक इनामदार प्राध्यापक गोपाळ काकडे सुरेश अण्णा गवळी उपस्थित होते या शिबिरात एकूण ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले यावेळी शहरातील गणेश भक्त सामाजिक, राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी कार्यकर्ते व शहरातील पत्रकार बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी शिवगर्जना गणेश मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# अंबाजोगाईतील संविधान भान आणि सामाजिक जाण या उपक्रमाची द आयडियल इंडियन बुक ऑफ रेकॉड्र्समध्ये नोंद

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी अंबाजोगाई येथील सर नागेश जोंधळे यांच्या आई संस्थेने आयोजित केलेल्या अभिनव संविधानभान उपक्रमाची द आयडियल इंडियन बुक ऑफ रेकॉड्र्स मध्ये नोंद झाली आहे. या उपक्रमाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता देणारी संस्था असलेल्या द आयडियल इंडियन बुक ऑफ रेकॉर्डसने उपक्रमांची नोंद घेतली आहे.

स्वातंत्र्य दिनाच्या विशेष प्रसंगी आयोजित केलेल्या या उपक्रमात अंबाजोगाई येथील कृषी महाविद्यालय आणि सिताफळ संशोधन केंद्राच्या परिसरात संविधानाच्या सर्व ३९५ कलमांचे शीर्षक असलेले ३९५ फलक विद्यार्थ्यांनी आणि मान्यवरांनी हातात घेऊन मानवी साखळी तयार करून भव्य वर्तुळ बनवले. संविधानाविषयी जनजागृती आणि लोकशाहीच्या मूल्यांचा प्रसार हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमात कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी, आई सेंटर प्रोचे विद्यार्थी आणि विविध शैक्षणिक संस्थांचे विद्यार्थी, वैद्यकीय, सामाजिक, शैक्षणीक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. मान्यवरांमध्ये कृषी महाविद्यालय लातूरचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे, कृषी महाविद्यालय अंबाजोगाईचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.संजीव बंटेवाड, सिताफळ संशोधन केंद्राचे प्रा.गोविंद मुंढे, सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ व इंडीयन मेडीकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, डॉ.इंद्रजीत भगत, ज्येष्ठ पत्रकार जगनबापू सरवदे, ऍड.संतोष पवार, किर्तीराज लोणारे, कवी राजेश रेवले, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक विष्णू रोडे, सेवानिवृत्त वन अधिकारी शिवाजी गिरी, इंग्लिश विंग्स प्री प्राइमरी स्कूलच्या प्राचार्या स्वाती वाकळे, सीमा पटेकर, प्रा.सचिन कराड, प्रा.राहुल सुरवसे, डॉ.संदीप जैन, प्रतीक गौतम, आदित्य पवार,



सेजल रोडे, शुभांगी गायकवाड, निकिता काळे, सृष्टी जोगदंड, जयदत्त कुलकर्णी, पृथ्वी कसबे व इतर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपक्रमात सहभागी झाले होते. कार्यक्रमादरम्यान संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाची माहिती देण्यात आली आणि संविधानाच्या प्रास्ताविकेच समूहवाचन डॉ.राजेश इंगोले यांनी केले वसंविधानाविषयी कृतज्ञता व्यक्त केली. सर जोंधळे यांनी या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व सहभागी व्यक्तींचे आभार मानले आणि स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने अशा प्रेरणादायक उपक्रमांचे आयोजन केल्याने तरुणांमध्ये राष्ट्राप्रती व संविधानाप्रति आदर निर्माण होतो असे सांगितले. संपूर्ण भारतात अशा प्रकारचा हा उपक्रम एकमेवाद्वितीय असल्याचे सांगत द आयडियल इंडियन बुक ऑफ रेकॉड्र्सच्या पदाधिकार्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आणि सर नागेश जोंधळे यांना प्रशस्तीपत्र प्रदान केले. या सन्मानामुळे आई संस्थेच्या उपक्रमाला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून, सामाजिक जागरूकतेच्या क्षेत्रात एक नवा विक्रम नोंदवला गेला आहे. या आगळ्यावेगळ्या उपक्रमाबाबत बोलताना सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी संविधानभान उपक्रमाने संविधानाविषयी जनजागृती, देशाप्रती प्रेम व्यक्त करण्याचे कार्य उत्कृष्टरीत्या पार पाडले आहे. संविधानामुळे सर्वसामान्य माणसाला काय मिळाले याच सहज प्रबोधन याद्वारे झाले आहे. सर नागेश जोंधळे आणि त्यांच्या टीमने उत्कृष्ट कार्य केले आहे. द आयडियल इंडियन बुक ऑफ रेकॉड्र्स मध्ये या उपक्रमाची नोंद होणे ही समस्त अंबाजोगाईकरांच्या दृष्टीने गौरवाची गोष्ट आहे आणि नागरिकांना जागरूक करण्याच्या दिशेने पडलेले एक महत्वाचे पाऊल आहे. या उप्रकमामध्ये सहभागी होता आले याचा आनंद आहे या शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या. आई सेंटरचे संचालक सर नागेश जोंधळे यांनी अंबाजोगाईतील संविधानभान उपक्रमाची द आयडियल इंडियन बुक ऑफ रेकॉड्र्स मध्ये नोंद होणे हे एक अभिमानाची आणि गर्वाची गोष्ट असल्याचे मत व्यक्त केले. हा विक्रम संविधानाच्या महत्त्वाची जाणीव वाढवण्यासाठी आणि लोकशाहीच्या मूल्यांचा प्रसार करण्यासाठी उपयुक्त ठरला आहे. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी सहभागी असलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे आणि मान्यवरांचे मनःपूर्वक आभार. मानतो, आई संस्था आणि आमच्या सर्व सहकार्यांनी एकत्र येऊन हा उपक्रम शक्य केला, यासाठी आम्ही सर्वांचे आभारी आहोत ही प्रतिक्रिया दिली. प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांनी प्रतिक्रिया देताना स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आयोजित संविधानभान उपक्रमा

# पीक कर्जमाफीसाठी पारडगावात बेमुदत उपोषणाचा नववा दिवस, प्रशासनाला जाग कधी येणार

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील पारडगाव येथे ४ सप्टेंबरपासून गणेश मंडपे या शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी, या प्रमुख मागणीसाठी आमरण उपोषणाला बसले आहेत. १२ सप्टेंबर रोजी त्यांचा ९वा दिवस आहे.

शेतकऱ्यांना विविध अस्मानी संकटांचा सामना करावा लागत आहे. कधी कोरडा दुष्काळ, तर कधी ओला दुष्काळ, अतिवृष्टीमुळे पिकाचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे राज्य सरकारने कर्जमाफी करावी अशी श्री मंडपे त्यांची मागणी आहे, . या उपोषणाला शेतकऱ्यांसह गावकऱ्यांचा पाठिंबा आहे. परंतु, शासनाला निवेदन देऊन सुद्धा अद्याप झोपेचं सोंग घेणारे अधिकारी फिरकले नाहीत. उपोषणकर्त्यांची तब्येत बिघडत आहे. शासनाने दखल



घेऊन उपोषणकर्त्यांची मागणी मान्य करावी, अशी मागणी होत आहे.

सन २०१९ मध्ये ओला, सन २०२२ मध्ये पुन्हा ओला आणि सन २०२३ मध्ये कोरडा दुष्काळ व अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. केंद्र व राज्य सरकारकडून कापूस, सोयाबीनला योग्य भाव मिळत नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे सरसकट पीक कर्ज माफ करावे. त्यासाठी मी उपोषणाला बसलो आहे. असे शेतकरी गणेश मंडपे यांनी सांगितले तसेच ते म्हणाले की माझा उपोषण मुळे बलिदान गेला तरी चालेल पण संपूर्ण शेतकऱ्याला कर्जमाफी झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. यावेळी उपोषण स्थळी शेतकरी दत्ता काळे, गंगाधर शिंदे, प्रकाश काळे, दिगंबर काळे, गजानन ढेरे, शिवाजी भालेकर, अकबर सय्यद यांनी भेट दिली.

# दारू पिण्यास पैसे देत नसल्याने पतीने केला पत्नीचा खून,पती अटकेत

जालना । प्रतिनिधी

पत्नी दारू पिण्यास पैसे देत नसल्याने व तसेच पत्नीवर अनैतिक संबंध असल्याचे संशय घेऊन पतीने केला पत्नीचा खून अशी कबुली जवाब आरोपी पांडुरंग दत्ता वगरे यांनी दिला अशी माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक अहमद यांनी दिली याप्रकरणी पोलिसांनी तत्काळ आरोपीला अटक केलं. याप्रकरणी सविस्तर माहिती अशी की

अंबड तालुक्यातील एकलहेरा येथील पती, पत्नीला बेशुध्दावस्थेत ग्रामस्थांनी तीर्थपुरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले होते. त्यापैकी पत्नीला तपासून डॉक्टरांनी मृत घोषीत केले. मात्र शवविच्छेदन अहवालात गळा दाबल्याने मृत्यू झाल्याचा अहवाल आल्यानंतर तीर्थपुरी पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला. रुख्मिणी पांडुरंग वगरे (वय ३०) असे मयत महिलेचे नाव असून हा खून तिचा पती पांडुरंग दत्ता वगरे (वय ३६) याने केल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी रात्रीच त्याला तत्काळ अटक केली आहे. अंबड तालुक्यातील एकलहरा येथील रुख्मिणी वगरे व त्यांच्या पतीला काहींनी बेशुध्दावस्थेत ८ सप्टेंबर रोजी तीर्थपुरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पत्नीचा खून केल्याप्रकरणी तीर्थपुरी पोलिसांनी अटक केलेला आरोपीउपचारासाठी दाखल केले होते. परंतु, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी रुख्मिणी वगरे यांना तपासून मृत घोषित केले. त्यामुळे तीर्थपुरी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. दरम्यान तीर्थपुरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी शिवाजी घुले यांनी शवविच्छेदन अहवाल सादर केला. त्यात महिलेचा मृत्यू गळा दाबल्याचे निष्पन्न झाले. याबाबत पोलिस उपनिरीक्षक प्रतिभा पठाडे यांच्या फिर्यादीवरून

खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. तीर्थपुरी पोलिसांनी मयत महिलेचा पती पांडुरंग दत्ता वगरे यास ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखवत विचारपूस केली असता त्याने खून केल्याची कबुली दिली. त्याला अटक करण्यात आली. दरम्यान उपविभागीय पोलिस अधिकारी विशाल खांबे, तीर्थपुरी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक साजिद अहमद यांनी घटनास्थळी भेट देवून पाहणी केली पुढील तपास पोलीस करीत आहे.

# बोंबला.. माजलगाव तहसील कार्यालयात पिण्याचे, पाणी स्वच्छतागृहच नाही

**माजलगाव । प्रतिनिधी**

तहसील कार्यालयाकडे पाहिले जाते, मात्र माजलगाव तहसील कार्यालयात हजारो नागरिक दररोज उंबरे झिजवत असताना तहसील कार्यालयात कुठलेच काम होत नाही याशिवाय वयोवृद्ध नागरिक अपंग आणि गर्भवती महिला हे देखील संजय गांधी निराधार इंदिरा गांधी निराधार योजनेच्या विविध कामासाठी तहसील कार्यालयाचे उंबरे झिजवत असताना तहसील कार्यालयात दिवस ठाण मांडून बसतात पण तहसीलदार यांना त्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावीशी वाटली नाही याशिवाय मुतारी संडास बाथरूम यांचा अभाव तहसील कार्यालयात





असल्याने शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला असून तहसीलदार यांनी १७ सप्टेंबर पूर्वी तहसील कार्यालयात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी महिलांसाठी अपंगासाठी, वयोवृद्धांसाठी ,पुरुषांसाठी स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात यावी याशिवाय तहसील कार्यालयात चाललेली अधिकारी कर्मचारी यांची मनमानी थांबवावी तहसील कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी मुख्यालय वास्तव्यास थांबावे, तसेच तहसील कार्यालयात चाललेला भ्रष्टाचार थांबवून सामान्य नागरिकाची कोळंबून पडलेली कामे त्वरित करण्यात यावीत आदी मागण्याचे दहा सप्टेंबर रोजी तहसीलदार माजलगाव यांना निवेदन दिले यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी तहसीलदार यांनी वृद्ध अपंग व गर्भवती महिला यांच्यासह नागरिकांची हेळसांड थांबवावी अन्यथा १७ सप्टेंबर पासून तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला असून या

लुका सह चिटणीस भाई राहुल सोळंके, भाई सतीश शेजुळ पुरोगामी युवक संघटनेचे तालुका अध्यक्ष भाई अशोक कुलकर्णी भाई चांगदेव शेजुळ भाई आनंत चव्हाण, भाई विष्णू शेळके भाई सुदाम चव्हाण भाई गोविंद घाटूळ भाई माऊली चंदनशिव आदींच्या स्वाक्षरी आहेत.

# सरपंच खोटे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप करणार

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण गावचे आदर्श सरपंच श्री दत्तात्रय खोटे यांचा १२ सप्टेंबर रोजी अभिष्टचिंतन सोहळा आहे, त्यानिमित्त शालेय साहित्य वाटप तसेच सकाळी १० ते १२ वेळेस ह.भ. प संग्राम (बापू) भंडारे यांचे कीर्तन होणार आहे, त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल, सांगवी पाटण गावात २ पंचवार्षिक पासून सरपंच पदी निवडून येत आहेत,आ.सुरेश (आण्णा) धस यांचे निकटवर्तीय म्हणून त्याची तालुक्यात ओळख



आहे,तसेच ते सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन ते काम करतात, सामाजिक ,धार्मिक क्षेत्रात त्यांचे उल्लेखनीय कार्य आहे, लोकांच्या सुख दुःखात नेहमीच सहभागी असतात, त्यांची काम करण्याची पद्धत दुसऱ्यांपेक्षा वेगळी आहे, किर्तन व शालेय साहित्य वाटप करून सरपंच यांचा वाढदिवस ग्रामस्थ साजरा करणार आहेत, तरी सर्वांनी अभिष्टचिंतनाला उपस्थित राहावे असे आव्हान श्रीनाथ प्रतिष्ठान व शेतकरी ग्रुप सांगवी पाटण यांनी केलं आहे..

# शिवगर्जना फाऊंडेशन व सह्यागिरी विचारमंचचा मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना मदतीचा हात

युसूफवडगांव । प्रतिनिधी

शिवगर्जना फौंडेशन व सह्यगिरी विचारमंच कोल्हापूर यांच्या वतीने केज तालुक्यातील सादोळा व आनेगाव येथील जि.प शाळेतील गरजु विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

युसूफवडगावचे भूमिपुत्र व गेल्या १५ वर्षापासून कोल्हापुर जिल्ह्यात जि.प मध्ये शिक्षक म्हणुन कार्यरत असलेले शिवगर्जना फौंडेशनचे कार्याध्यक्ष व सह्यगिरी विचारमंचचे संचालक अमोल जोगदंड हे त्यांच्या सहकाऱ्यां सोबत मिळुन हे शिक्षण क्षेत्रात गरिब व गरजु विद्यार्थ्यांसाठी शालेय स्तरावर विविध शैक्षणिक उपक्रम राबवून त्या माध्यमातून आजपर्यंत हजारो विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व स्पर्धा परीक्षांचे मोफत मार्गदर्शन घेऊन हजारो विद्यार्थी घडवण्याचे काम करत आहेत अशा या





सामाजिक संस्थेच्यावतीने मराठवाड्यातील केज तालुक्यातील उच्च प्राथमिक शाळा सादोळा व आनेगाव जि.प्र शाळेतील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य संचाचे वितरण करण्यात आले.यावेळी शिवगर्जना फौंडेशनव सह्यगिरी विचारमंच करीत असलेल्या सामाजिक कार्याबद्दल शिक्षकांनी आपल्या मनोगतात फौंडेशन व विचारमंचचे कौतुक केले व पुढील शैक्षणिक व सामाजिक कार्यास सदिच्छा दिल्या याप्रसंगी शिवगर्जना फौंडेशन कार्याध्यक्ष अमोल जोगदंड सर,शाळेचे मुख्याध्यापक जोगदंड एम.एच,लाखे एल बी,चौधरी ए.डी,पवार एस.एस,धुतालमल एस.बी,दळवे व्ही.डी,मांगडे जयराम श्री.पौळ सर,पत्रकार सचिन उजगरे,जयराज निशिगंध व ग्रामस्थ उपस्थित होते.

# सर्जेराव काकडे पाटील यांचे निधन

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील किन्ही काकड्याची येथील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक सर्जेराव साहेबराव काकडे पाटील वय ९७ यांचे पुणे येथे दुखतं निधन झाले गुरुवार दि १२ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता



किन्ही ता. आष्टी येथे होणार आहे सर्जेराव पाटील यांनी मोगलाई विरुद्ध लढा देऊन तालुक्यात त्या काळात वाघळूज येथील चौकी जाळली होती त्यांच्या निधनाची बातमी कळताच किन्ही सह तालुक्यात शोककळा पसरली त्याच्या पाठीमागे पत्नी, मुलगा शरद व आप्पासाहेब आणि मुली, जावई, सुना नातवंडे असा परिवार आहे.

# निराधारांना जीवनावश्यक वस्तुंचे वितरण

## डॉ.व्दारकादास लोहिया यांच्या जयंती दिनी राबविला उपक्रम



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मानवलोक संस्थेचे संस्थापक तथा महाराष्ट्रातील प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते कै. व्दारकादास लोहिया यांच्या जयंती निमित्तमानवलोक सेवाभावी संस्था तसेच जनसहयोग यांच्या वतीने तळागाळात जीवन जगणारे सामान्य लोक, वृद्ध निराधार यांना जीवनावश्यक वस्तुंचे वितरण कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. यावेळी एस.एम.जोशी सोशालिस्ट फाऊंडेशनचे सहसचिव उपेंद्र टण्णु, सामाजिक कार्यकर्त्या पुष्पा क्षिरसागर,

पान ६ वरून...

## जि.प.शाळा वाचवण्यासाठी

सरकारची शाळा आहे आणि ती वाचवण्यासाठी शाळा समिती व पालक आणि गावकरी प्रयत्न करत असताना त्यांना त्रास हे अधिकारी कशामुळे देत असतील असा सवाल आता उपस्थित होत आहे यावर दुसऱ्याच दिवशी मंगळवारी दिनांक दहा रोजी गटशिक्षणाधिकारी बेडसकर नांदूर घाट येथे येऊन शाळेत सर्व जुने डॉक्युमेंट व कागदपत्रे तयार करून अहवाल केला असून व या विद्यार्थ्यांचे ॲडमिशन नवोदय साठी तात्काळ करण्यासाठी आले या विद्यार्थ्यांचे नवोदयला ॲडमिशन होतील तसेच या विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी नांदूर घाट जिल्हा परिषद शाळेमध्ये एक अतिरिक्त शिक्षक सुद्धा तात्काळ देतो असे लेखी स्वरूपात आश्वासन दिले परंतु तात्पुरता गावकऱ्यांना उपाय नकोय लेकरांचे नुकसान होणार नाही ठीक आहे परंतु शाळा टिकली पाहिजे गुणवत्ता चांगली आहे त्यामुळे जी जुनी शाळा होती त्याच शाळेचे पुनर्जीवन करण्यासाठी सर्व गावकऱ्यांनी व शाळा समितीने ठरवले आहे व त्या निर्णयावर ठाम आहेत एक महिन्याच्या आत पुनर्जीवीत शाळा नाही केली तर महाराष्ट्रातले सर्वात मोठे आंदोलन ते देखील जिल्हा परिषद शाळेसाठी शासन दरबारी केले जाईल असे गावकऱ्यांनी म्हटले आहे.

नांदूरच्या जिल्हा परिषद शाळेत दर्जेदार शिक्षण देण्यात येत आहे विद्यार्थ्यांवर लक्ष देण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे आहेत व सुरक्षितता आहे गुणवत्तेत मोठा फरक पडला आहे त्यामुळे आम्हाला आमचे लेकर जिल्हा परिषद शाळेतच शिकवायची आहेत सरकारने सरकारी शाळा चालवायला पाहिजेत आम्हाला आमच्या लेकरांना या जिल्हा परिषद शाळेत शिकवायचे आहे त्या ठिकाणाहून आम्ही लेकरं काढणार नाहीत लेकरांचे नुकसान झाले तर शिक्षणाधिकारी गटशिक्षणाधिकारी जिम्मेदार राहतील व जिल्हा परिषद प्रशासन जिम्मेदार राहील.

सुशील कानडे / फिरोज शेख /
( पालक )

## निराधारांना जीवनावश्यक

कल्पना लोहिया,इशिता लोहिया, अरूण आसरडोहकर, सामाजिक कार्यकर्ते शाम सरवदे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. मानवलोक संस्था सामाजिक कार्यासाठी ओळखली जाते समाजात निराधार, वृद्ध तसेच हाल अपेष्टात जीवन जगणाऱ्यांसाठी ही संस्था आधार असून कै.बाबुजींनी केलेले कार्य अजुनही अव्याहतपणे चालू आहे याचे समाधान वाटते व पुढेही चालू राहील ही खात्री असल्याचे उपेंद्र टण्णु यांनी मनोगतात सांगितले पुष्पा क्षीरसागर यांनीही बाबुजींच्या कार्यास उजाळा दिला यावेळी उपस्थितांच्या हस्ते निराधार,वृद्ध,महिला यांना जीवनावश्यक वस्तुंचे वितरण करण्यात आले. मुद्रिका रंगनाथ जोगदंड यांनी कै. व्दारकादास लोहिया यांच्या जीवन कार्यावरील स्वलिखित गीत गायिले.

प्रास्तविक व संचालन शाम सरवदे यांनी केले संजना आपेट यांनी आभार मानले.

## आ.नितेश राणेंविरूद्ध

करणाऱ्या वक्तव्यामुळे महाराष्ट्रासह भारत देशात दंगली घडवून सामाजिक वातावरण अस्थिर करण्याचा आ.राणे यांचा प्रयत्न असून त्यांच्यावर राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली गुन्हा नोंद करून अटक करा., २) केज पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या येवता (ता.केज) येथे इयत्ता ३ री वर्गामध्ये शिकत असलेल्या मागासवर्गीय समाजातील विद्यार्थ्यांला त्याच गावातील सवर्ण दुकानदाराने चॉकलेट चोरले असा खोटा आरोप करीत झाडाला हात-पाय बांधून मारहाण केली, शिव्या दिल्या या प्रकरणी केज पोलिसांनी ॲट्रॉसिटी कायदा कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. तरी परंतु, याप्रकरणी बाललैंगिक आत्याचार कायद्यानुसार ही गुन्हा नोंद करून आरोपीला तात्काळ अटक करावी., ३) एका ११ वर्षीय मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी परळी ग्रामीण पोलिस स्टेशन मध्ये दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी दाखल गुन्ह्यातील आरोपीला तात्काळ अटक करून पिडीतेला तात्काळ शासकीय मदत द्या., ४) अंबाजोगाई शहर व तालुक्यात काही प्रायव्हेट फायनान्स कंपनीचे एजंट दारात बसून जाचक पध्दतीने कर्ज वसुलीसाठी महिलांना त्रास देत असल्यामुळे अशा प्रायव्हेट फायनान्सवर गुन्हे दाखल करून दादागिरीने वसुली करणाऱ्या एजंट व फायनान्स मॅनेजरवर प्रतिबंध घाला., ५) सदर बाजार, पेन्शनपुरा, फ्लॉवर्स क्वॉर्टर, लालनगर, क्रांतीनगर अंबाजोगाई भागातील स्वस्त धान्य एपीएल रेशनकार्ड धारकांचे धान्य बंद केले आहे. मुळात हे कार्डधारक एपीएल मध्ये येत नसताना त्यांची एपीएल मध्ये नोंद केली. त्यांना बीपीएल योजनेमध्ये समाविष्ट करण्यात यावे, ६) दिनांक ४ सप्टेंबर २०२४ रोजी अंबाजोगाई शहर पोलिस स्टेशन मध्ये दाखल ॲट्रासिटी गुन्ह्यामध्ये फिर्यादी पिडीत ज्ञानेश्वर भाऊसाहेब पारधे, अविनाश बालाजी जोगदंड, गणेश मोहन आगळे यांना तात्काळ पोलिस संरक्षण द्या, सदरील गुन्ह्यातील आरोपींना तात्काळ अटक करा व पिडीतेला तात्काळ शासकीय मदत द्या यासह अन्य मागण्यांचा समावेश आहे. सदरील निवेदनावर ऑल इंडिया पँथर सेनेचे प्रदेश सरचिटणीस जीवन गायकवाड, मराठवाडा युवक अध्यक्ष अक्षय भुंबे, प्रदेश कार्याध्यक्ष अशोक घडवे पाटील, महिला जिल्हाध्यक्ष मिनाताई लोंढे, युवक जिल्हाध्यक्ष नितीन गोदाम, जिल्हा सचिव वसिमभाई शेख, जिल्हा सरचिटणीस विजयबाबा कांबळे, जिल्हा संघटक सुशिल गायकवाड, युवा नेते अमर वाघमारे, तालुकाध्यक्ष बादल तरकसे, केज तालुकाध्यक्ष समाधान बचुटे, युवा जिल्हा उपाध्यक्ष विश्वास भालेराव, युवा तालुकाध्यक्ष विशाल उर्फ शैलेंद्र बनसोडे (अंबाजोगाई), युवा तालुकाध्यक्ष राजकुमार धिवार (केज), युवा तालुकाध्यक्ष धम्मपाल भुतके (परळी), तालुका उपाध्यक्ष कमलाकर घाडगे (परळी), तालुका उपाध्यक्ष बाळासाहेब शेवाळे (अंबाजोगाई), रेखाताई मस्के, युवा तालुका उपाध्यक्ष अक्षय कसबे, शहराध्यक्ष भैय्या सोनकांबळे आदींसह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

गृहमंत्र्यांना इशारा :

भाजपा आ.नितेश राणे यांच्यावर गुन्हा दाखल करा, तसेच केज तालुक्यातील येवता येथे मागासवर्गीय समाजातील शाळकरी मुलाला चॉकलेट चोरल्याचे खोटे कारण सांगून त्याचे हात पाय बांधून मारहाण व शिविगाळ केली. याप्रकरणी बाल लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल करून आरोपीला अटक करावी. एका ११ वर्षीय मुलीवर अत्याचार झाला आहे. या प्रकरणी परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात पीडित कुटुंबाची तक्रार घेतली नाही, अशा संवेदनशील प्रकरणात पालकमंत्री यांनी केवळ बघ्याची भूमिका घेणे योग्य नाही. याप्रकरणी ही गुन्हा दाखल करून खऱ्या आरोपीला अटक करावी. राज्यासह मराठवाडा व बीड जिल्ह्यात होत असलेल्या अन्याय, अत्याचाराच्या घटना थांबल्या नाहीत. तर राज्याच्या गृहमंत्र्यांच्या तोंडाला काळे फासू. - अक्षय भुंबे,(मराठवाडा युवक अध्यक्ष, ऑल इंडिया पँथर सेना.)

## चित्रकला व निबंध स्पर्धेच्या

शेख मॅडम यांच्यासह सर्व शिक्षक उपस्थित होते तसेच ही स्पर्धा पार पाडण्यासाठी मंडळाचे मिनीनाथ दादा फड (व्हा चेअरमन ) रामहरी फड माजी उपसरपंच रामकिसन ( पिंटू ) फड, प्रल्हाद गीते ग्रा.सदस्य , ऋषिकेश फड श्रीकृष्ण फड ज्ञानेश्वर फड दिलीप फड राज फड यांच्यासह इतर उपस्थित होते.

## ॲड.नरसिंह जाधव

वतीने ॲड . नरसिंह जाधव यांना उमेदवारी देण्यासंदर्भामध्ये आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब तसेच संसदरत्न खासदार सुप्रिया सुळे यांची देखील भेट घेऊन आजपर्यंत केलेला कामाचा सर्व आढावा पक्ष श्रेष्टीकडे ॲड . नरसिंह जाधव व शिवभूषण जाधव यांनी सादर केला . तसेच मा . उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथील वकील संघ व आष्टी , पाटोदा , शिरूर , येथील वकील संघातील वकिलांनी ॲड . नरसिंह जाधव यांना उमेदवारी द्यावी अशी शिफारस पत्र देखील आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब सादर केले.

cmyk

# समातर जलवाहिनीमुळे उजनीतून शेतीला एक आवर्तन जादा मिळणार



सोलापूर : सोलापूर शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी समांतर जलवाहिनी टाकली जात आहे. या जलवाहिनीचे काम आता अंतिम टप्प्यात आहे. या जलवाहिनीमुळे दरवर्षी शहरासाठी भीमा नदीतून सोडावे लागणाऱ्या जवळपास २२ टीएमसी पाण्याची बचत होणार आहे, त्यामुळे आगामी उन्हाळ्यात शेतकऱ्यांना एक आवर्तन जास्त मिळण्याची शक्यता आहे.

दरवर्षी साधारणतः १० फेब्रुवारीपासून शेतीसाठी पहिले आवर्तन सोडले जाते. तत्पूर्वी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत पाणी वाटपाचे नियोजन निश्चित होते. दरवर्षी योजनेतून रब्बी हंगामात जानेवारी महिण्यात शेतीसाठी पाणी सोडलं जात, पण यंदा चांगला पाऊस झाल्याने फेब्रुवारीत हे आवर्तन सुटेल. दुसरीकडे दरवर्षी सोलापूर शहरासाठी उन्हाळ्यात उजनी धरणातून प्रत्येक १५ दिवसातून एकदा भीमा नदीत पाणी सोडले जाते.

पण आता समांतर जलवाहिनी टाकली जात असून, नोव्हेंबर अखेर हे काम पूर्ण होणार आहे. त्यानंतर पुढील उन्हाळ्यात भीमा नदीतून पाणी सोडणे बंद होईल ते पण नव्याने सुरू होणाऱ्या उपसा सिंचन योजना शेतीसाठी वापरले जाईल. धरणाच्या आठमाही नियोजन असते तरीदेखील गरजेनुसार शेतीसाठी एक आवर्तन जादा सोडण्याची शक्यता आहे. शहरासाठी नदीतून पाणी सोडावे लागत असल्याने धरणाची पाणी पातळी घटते आणि कॅनॉलमधून पाणी लवकर सोडावे लागते. धरण पंधरा ते वीस टक्के झाल्यावर कॅनॉलमधून पाणी सोडता येत नाही. आता भीमा नदीतून पाणी सोडणे बंद होत असल्याने अशी वेळ येणार नाही शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार पाणी सोडणे शक्य होईल त्याचे नियोजन कालवा सल्लागार समितीत निश्चित होईल. सोलापूर शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी समांतर दुसरी जलवाहिनी टाकली जात आहे. त्यानंतर भीमा नदीतून प्रत्येक वेळी पाणी सोडणे बंद होणार आहे. त्यामुळे पाणी नियोजन करणे सोयीचे होणार आहे.

# नैसर्गिक शेतीद्वारे शेतकऱ्याने पिकवला ७ फूट लांबीचा दुधीभोपळा!

मध्य प्रदेशातील शेतकरी मानसिंग गुर्जर हे नैसर्गिक शेतीद्वारे देशी बियाणांची समृद्धता जपत आहेत. मानसिंग यांनी ७ फूट लांबीचा दुधी भोपळा तर पिकवला आहेच शिवाय वेगवेगळ्या पिकातून वार्षिक ३० लाख रुपये कमवत आहेत, आणि ते सुद्धा नैसर्गिक शाश्वत शेती पद्धतीद्वारे.

मध्य प्रदेशातील नर्मदापुरम जिल्ह्यात, गर्धा हे एक छोटेसे गाव आहे, जिथे नैसर्गिक शेती करणारे शेतकरी मानसिंग गुर्जर राहतात. गेल्या १४ वर्षांपासून मानसिंग सतत सेंद्रिय शेतीमध्ये सहभागी आहेत. त्याशिवाय, ते शाश्वत शेतीचे भविष्य सुरक्षित ठेवत ६०० हून अधिक देशी बियाण्यांचे जतन करतात. हे करत असताना ७ फूट लांब दुधीभोपळा आणि ३० किलोचा कलिंगड वाढवण्याचा अतुलनीय विक्रम सुद्धा त्यांनी केलेला आहे. देशभरातील शेतकऱ्यांसाठी त्याचे हे कार्य प्रेरणास्थान आहे.

कमी खर्चासह उच्च उत्पन्न : त्याच्या ८ एकर जमिनीवर, मानसिंग ८००६, ८६५ आणि ८६०५ या जाती वापरून ऊस शेती करतो, ज्यातून त्याला एकरी ४०० ते ५०० क्विंटल उत्पादन मिळते. उरलेल्या जमिनीवर तो हरभरा आणि मोहरी यांसारखी पिके घेतो, त्यामुळे उत्पन्नात विविधता येते. रसायनेमुक्त नैसर्गिक शेती त्याला कमी खर्चात जास्तीत जास्त नफा मिळवून देतात.

नैसर्गिक उत्पादनाची शक्ती : मानसिंग यांच्या नैसर्गिकरित्या पिकवलेल्या पिकांना जास्त मागणी आहे. त्याचे उत्पादन अनेकदा आगाऊ बुक केले जाते आणि तो थेट घरपोच बाजार भावापेक्षा दुप्पट दराने विकतो. रासायनिक पद्धतीने पिकवलेला हरभरा बाजारात ५० रुपये प्रतिकिलो मिळत असताना, त्याचा हरभरा १०० रुपये प्रति किलोने विकला जातो, जे त्याच्या उत्पादनाच्या उत्कृष्ट दर्जाचे उदाहरण देते. त्याच्या बन्सी आणि लोकन गव्हाचे वाण देखील १० ते १२ क्विंटल प्रति एकर उत्पादन देतात आणि नैसर्गिक, रासायनिक-मुक्त धान्यांना महत्त्व देणाऱ्या ग्राहकांकडून त्याला खूप मागणी असते.



परंपरेत रुजलेली दृष्टी : मानसिंग यांच्यासाठी, शेती हा व्यवसायापेक्षा अधिक आहेशेतीच्या मुळांकडे परत जाणे हे एक ध्येय आहे. आपल्या देशी बियाण्यांचे जतन करूनच आपण शेतीचे भविष्य सुरक्षित करू शकतो, असे तो खात्रीने सांगतो. शेतकऱ्यांनी महामंडळाच्या फायद्यासाठी नव्हे तर स्वतःसाठी पीक घेतले पाहिजे यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. ''घरगुती बियाणे, घरगुती खते आणि घरगुती चव'' हे त्यांचे ब्रीदवाक्य या तत्त्वज्ञानाला मूर्त रूप देते. ते देशभरातील शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती स्वीकारण्यासाठी, शुद्ध, निरोगी धान्य उत्पादन करण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी प्रोत्साहित करतो. ''नैसर्गिक शेती हा शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवण्याचा मार्ग आहे. ही केवळ एक पद्धत नाही; ही चळवळ शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी आणि त्यांची समृद्धी सुनिश्चित करण्यासाठी आहे.''


# पौष्टिक मक्याचे वाण शेतकऱ्यांसाठी शाश्वत फायदा देणारे

आयसीएआरने विकसित केलेले हे उच्च-उत्पन्न देणारे मक्याचे संकरित वाण हे लाइसिन आणि ट्रिप्टोफॅन सारख्या आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध आहेत, ज्यामुळे ते भारतातील विविध भागात शाश्वत शेतीसाठी आदर्श आहेत. हे सुधारित पौष्टिक मूल्य असलेले वाण शेतकऱ्यांना जास्त नफा मिळवून देतात. जाणून घेऊ या मक्याच्या या वाणांची वैशिष्ट्ये.

विवेक क्यूपीएम ९ हायब्रिड वाण : विवेक क्यूपीएम ९ हा वाण लाइसिन (४.१९% प्रथिने) आणि ट्रिप्टोफॅन (०.८३% प्रथिने) ने समृद्ध आहे. ही जात खरीप हंगामासाठी जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि दक्षिण आणि ईशान्येकडील अनेक राज्यांसाठी अत्यंत योग्य आहे. पीक ८८ दिवसात परिपक्व होते आणि ५२.० क्विंटल प्रति हेक्टर धान्य उत्पादन आहे.

पुसा एचएम ४ सुधारित हायब्रिड वाण : २०१७ मध्ये प्रसिद्ध झालेली, ही मक्याची जात ३.६२% लायसिन आणि ०.९१% प्रथिने ट्रिप्टोफॅन यांनी समृद्ध आहे, ज्यामुळे पारंपारिक संकर जातीपेक्षा यामुळे ही जात चांगली आहे. पीक ८७ दिवसांत परिपक्व होते आणि ६४.२ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन देते. हे पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि उत्तराखंड आणि पश्चिम उत्तर प्रदेशच्या काही भागांमध्ये खरीप हंगामासाठी अनुकूल आहे.

पुसा एचएम ८ सुधारित हायब्रिड वाण : २०१७ मध्ये प्रसिद्ध झालेली ही जात महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि तामिळनाडू सारख्या प्रदेशांसाठी योग्य आहे. ही संकरित जात ६२.६ क्विंटल प्रति हेक्टर धान्य उत्पादन देते आणि ९५ दिवसात परिपक्व होते. या जातीच्या मक्यात ४.१८% लाइसिन आणि १.०६% ट्रिप्टोफॅनने प्रमाण आढळून येते, ज्यामुळे ते मानव आणि पशुधन दोन्हीसाठी एक अत्यंत पौष्टिक पर्याय आहे.



पुसा एचएम ९ सुधारित हायब्रिड वाण : पुसा एचएम ९ (९) ही सुधारित, जात बिहार, झारखंड, ओरिसा, पूर्व उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालमधील खरीप हंगामासाठी योग्य आहे. ५२.० क्विंटल प्रति हेक्टर धान्य उत्पादन आणि ८९ दिवसांच्या परिपक्वता कालावधीसह, हा एक कार्यक्षम आणि अनुकूल वाण आहे. यात लाइसिनचे प्रमाण २.९७% आहे आणि प्रथिनांमध्ये ट्रिप्टोफॅनचे प्रमाण ०.६८% आहे.

पुसा विवेक क्यूपीएम ९ सुधारित हायब्रिड वाण : पुसा विवेक क्यूपीएम९ सुधारित हा भारतातील पहिला प्रो व्हिटामिन-ए समृद्ध मका आहे. जो भारतीय कृषी संशोधन संस्था, नवी दिल्ली यांनी विकसित केला आहे. यात ८.१५ पीपीएम प्रो. विटामिन-ए, २.६७% लाइसिन आणि ०.७४% ट्रिप्टोफॅन प्रथिने आहे. जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, ईशान्य, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि तामिळनाडू यांसारख्या प्रदेशांमध्ये खरीप हंगामासाठी हा योग्य वाण आहे. हा संकर वाण पर्वतीय भागात ९३ दिवसांत आणि द्वीपकल्पीय क्षेत्रात ८३ दिवसांत परिपक्व होतो. धान्य उत्पादन ५५.९ ते ५९.२ क्विंटल प्रति हेक्टर असते.

पुसा व्हीएच २७ सुधारित संकरित वाण : पुसा व्हीएच २७ हे आणखी एक प्रोव्हिटामिन-ए समृद्ध मक्याचे संकरित वाण आहे. हे वाण बिहार, झारखंड, ओरिसा, पूर्व उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालमधील खरीप हंगामासाठी अनुकूल आहे. ८४ दिवसांच्या परिपक्वता कालावधीसह आणि ४८.५ क्विंटल प्रति हेक्टर धान्य उत्पादनासह, ही जात ५.४९ पीपीएम प्रोव्हिटामिन-ए देते, ज्यामुळे ती ग्राहकांसाठी एक पोषक पर्याय बनते.

पुसा एचक्यूपीएम ५ सुधारित हायब्रिड वाण : पुसा एचक्यूपीएम ५ ही सुधारित जात देशभरातील खरीप लागवडीसाठी उपयुक्त असलेले बहुमुखी संकर जात आहे. या मक्यात ६.७७ पीपीएम प्रोविटामिन-ए, ४.२५% लाइसिन आणि ०.९४% ट्रिप्टोफॅन प्रथिनांसह उच्च पौष्टिक मूल्य आहे. हे वाण क्षेत्रानुसार ८८ ते १११ दिवसांच्या दरम्यान परिपक्व होते आणि उत्पादन ५१.२ ते ७५.१ क्विंटल प्रति हेक्टर पर्यंत असते.

पुसा एचक्यूपीएम ७ सुधारित हायब्रिड वाण : पुसा एचक्यूपीएम ७ ही सुधारित जात विशेषतः महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि तामिळनाडूमधील खरीप हंगामासाठी उपयुक्त आहे. ७४.५ क्विंटल प्रति हेक्टर धान्य उत्पादन आणि ९७ दिवसांच्या परिपक्वता कालावधीसह, ७.१० पीपीएम प्रोव्हिटामिन-ए, ४.१९% लाइसिन आणि ०.९३% ट्रिप्टोफॅन प्रथिनांनी समृद्ध आहे.

आयक्यूएमएच २०१ हायब्रिड वाण :आयक्यूएमएच २०१ ही जात जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि ईशान्येकडील प्रदेशांमध्ये खरीप हंगामासाठी योग्य आहे. ही संकरित जात ८४.८ क्विंटल प्रति हेक्टर धान्य उत्पादन देते आणि १०१ दिवसात परिपक्व होते. यात लायसिन (३.०३% प्रथिने) आणि ट्रिप्टोफॅन (०.७३% प्रथिने) आहे. आयक्यूएमएच २०२ हायब्रिड वाण : आयक्यूएमएच २०२ ही संकर जात पंजाब, हरियाणा, दिल्ली, पश्चिम उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडच्या मैदानी प्रदेशात खरीप हंगामासाठी सर्वात योग्य आहे. ७२.० क्विंटल प्रति हेक्टर धान्य उत्पादन आणि ९६ दिवसांच्या परिपक्वता कालावधीसह, हा शेतकर्यांसाठी एक विश्वासार्ह संकरित वाण आहे.

आयक्यूएमएच २०३ हायब्रिड वाण : आयक्यूएमएच २०३ ही राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश आणि छत्तिसगड भागात खरीप हंगामासाठी विकसित केलेली संकरित मक्याची जात आहे. ही जात ६३.० क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन देते आणि ९० दिवसात परिपक्व होते. यात ३.४८% लायसिन आणि ०.७७% ट्रिप्टोफॅन प्रथिने असलेले हे वाण पौष्टिक मूल्यांनी समृद्ध आहे.




### महत्वाच्या घटना

१६६६ : आग्र्याहून सुटका झाल्यानंतर शिवाजीमहाराज राजगड येथे सुखरुप पोहोचले.
१७८६ : ब्रिटीश इस्ट इंडियाचे अधिकारी लॉर्ड कॉर्नवॉलिस हे भारताचे गव्हर्नर जनरल बनले.
१८५७ : कॅलिफोर्निया गोल्ड रश मध्ये सापडलेले १३-१५ टन सोने घेऊन जाणारे एस.एस. सेंट्रल अमेरिका हे जहाज सोने व ४२६ प्रवाशांसह बुडाले.
१८७३ : टाइपराइटर पहिल्यांदा ग्राहकांना विकण्यात आले.
१९१९ : ॲडॉल्फ हिटलर यांनी जर्मन वर्कर्स पार्टी मध्ये प्रवेश केला.
१९३० : विल्फ्रेड होंड्स यांनी आपला शेवटचा म्हणजे १११० वा प्रथमश्रेणी क्रिकेट सामना खेळला.
१९४८ : भारतीय सैन्य हैदराबाद संस्थानच्या हद्दीत शिरले. जुलुमी रझाकारांच्या मदतीने स्वतंत्र राहण्याचा निजामाचा हट्ट मोडून या फौजांनी हैदराबाद ताब्यात घेतले. हैदराबाद मुक्तीच्या या कारवाईचे वर्णन 'पोलिस ॲक्शन' असे केले जाते.
१९५९ : 'ल्यूना-२' हे मानवविरहित रशियन अंतराळयान चंद्रावर उतरले.
१९६६ : भारतीय जलतरणपटू मिहीर सेन यांनी डार्डानेल्स खाडी पार केली.
१९८० : तुर्कस्तानमधे लष्करी उठाव
१९९८ : डॉ. जयंत नारळीकर यांना 'पुण्यभूषण' पुरस्कार प्रदान
२००२ : मेटसॅट या भारताच्या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण.
२००५ : हाँगकाँगमधील डिस्नेलँड सुरू झाले.
२०११ : हल्ल्यांच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त एक समर्पण समारंभ पार पडल्यानंतर न्यूयॉर्क शहरातील स्मारक संग्रहालय सर्वांसाठी सुरु करण्यात आलं.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४९४ : फ्रान्सचा राजा फ्रान्सिस पहिला यांचा जन्म.
१६८३ : पोर्तुगालचा राजा अफोन्सो सहावा यांचा जन्म.
१७९१ : विद्युतशक्तीचे शास्त्रज्ञ मायकल फॅरेडे यांचा इंग्लंड येथे जन्म.
१८१८ : गॅटलिंग गन चे संशोधक रिचर्ड जॉर्डन गॅटलिंग यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १८०३)
१८९४ : विभूतीभूषण बंदोपाध्याय जागतिक ख्यातीचे बंगाली साहित्यिक. 'पथेर पांचाली', 'अपराजित', 'आरण्यक' या त्यांच्या काही उत्कृष्ट कलाकृती होत. 'इच्छामती' या त्यांच्या कादंबरीला रविन्द्र पुरस्कार देण्यात आला. (मृत्यू: १ नोव्हेंबर १९५०)
१८९७ : आयरिन क्यूरी नोबेल पारितोषिक विजेत्या फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १७ मार्च १९५६)
१९१२ : फिरोझ गांधी इंदिरा गांधी यांचे पती, पत्रकार व राजकारणी (मृत्यू: ८ सप्टेंबर १९६०)
१९४८ : मॅक्स वॉकर ऑस्ट्रेलियन क्रिकेट आणि फूटबॉलपटू (मृत्यू:)
१९७७ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू नेथन ब्रॅकेन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१८ : ऑस्ट्रेलियाचे चौथे पंतप्रधान जॉर्ज रीड यांचे निधन.
१९२६ : विनायक लक्ष्मण भावे मराठी साहित्य संशोधक, ग्रंथकार आणि 'महाराष्ट्र सारस्वत' या मराठी साहित्येतिहास ग्रंथाचे लेखक, १८९३ मध्ये त्यांनी ठाणे येथे मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना केली. (जन्म: १८७१)
१९५२ : रामचंद्र गणेश कुंदगोळकर तथा 'सवाई गंधर्व' हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, खाँसाहेब अब्दुल करीम खाँ यांचे शिष्य, पं भीमसेन जोशी आणि गंगुबाई हनगळ यांचे गुरू, दादासाहेब खापर्डे यांनी त्यांना 'सवाई गंधर्व' ही पदवी दिली. (जन्म: १९ जानेवारी १८८६)
१९७१ : जयकिशन डाह्याभाई पांचाळ 'शंकर-जयकिशन' या संगीतकार जोडीतील संगीतकार (जन्म: ४ नोव्हेंबर १९२९)
१९८० : चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते सतीश दुभाषी यांचे मुंबई-गोवा महामार्गावर 'मंतरलेली चैत्रवेल' हे नाटक घेऊन चाललेल्या नाटक कंपनीच्या बसला लागलेल्या आगीत जळाल्याने निधन झाले. (जन्म: १४ डिसेंबर १९३९)
१९८० : चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेत्री शांता जोग यांचे मुंबई-गोवा महामार्गावर 'मंतरलेली चैत्रवेल' हे नाटक घेऊन चाललेल्या नाटक कंपनीच्या बसला लागलेल्या आगीत जळाल्याने निधन झाले. (जन्म: २ मार्च १९२५)
१९९२ : पं. मल्लिकार्जुन मन्सूर हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, (ग्वाल्हेर घराण्याचे पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे शिष्य) नीलकंठबुवा अलुरमठ आणि (जयपूर घराण्याचे अध्वर्यू उस्ताद अल्लादियाँ खाँ यांचे पुत्र) मंजी खाँ व भुर्जी खाँ असे तीन गुरू त्यांना लाभले, पद्?मविभूषण व कालिदास सन्मान आदी मानसन्मान त्यांना मिळाले. (जन्म: ३१ डिसेंबर १९१०)
१९९३ : अमेरिकन अभिनेता रेमंड बर यांचे निधन.
१९९६ : पं. कृष्णराव रामकृष्ण चोणकर मराठी व गुजराती संगीत नाट्य सृष्टीतील गायक अभिनेते, एक तपाहून अधिक काळ 'गंधर्व नाटक मंडळी'मध्ये नटसम्राट बालगंधर्वांचे नायक म्हणून त्यांनी काम केले. (जन्म:)
१९९६ : पद्मा चव्हाण चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेत्री, स्त्रीसौंदर्याचा एक अनोखा नमुना म्हणून ख्याती असलेल्या पद्मा चव्हाणांच्या नाटकांच्या जाहिरातींत त्यांच्या नावाआधी 'मादक सौंदर्याचा ॲटम बॉम्ब' असे छापले जात असे. (जन्म: ७ जुलै १९४८)


# लोकसभेत भाजपने तब्बल ७७ हजार मते मिळवली

## बीड विधानसभा मतदारसंघाचा खरा दावेदार भाजपच – सलीम जहाँगीर

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघात दिवंगत लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांना आणि भाजपच्या विचारांना मानणारा वर्ग आहे. लोकनेत्या पंकजाताईंच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत याच मतदारसंघातील तब्बल ७७ हजार मतदारांनी लोकसभेत ताईंना मतदान केले. एकाकी असूनही भाजपने ७७ हजार मते मिळवली त्यामुळे बीड विधानसभा मतदारसंघाचा भाजपच खरा दावेदार असल्याचा दावा भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी केला. हा मतदारसंघ मुस्लिम बहुल असल्याने आणि सध्याची राजकीय समीकरणे पाहता लवकरच या संदर्भात पंकजाताईंना भेटणार असल्याचे सलीम जहाँगीर यांनी सांगितले.

बीड विधानसभा मतदारसंघ भाजपला मानणारा आहे. येथील पारंपरिक मतदार



दिवंगत लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या विचारांना आणि लोकनेत्या पंकजाताई यांच्या नेतृत्वाला मानणारा आहे. २०१४ च्या



विधानसभा निवडणुकीत भाजपच्या कमळ चिन्हावर स्व. विनायक मेटे साहेबांनी प्रतिस्पर्धी उमेदवाराला कडवी झुंज दिली. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप – सेना महायुतीचे उमेदवार जयदत्त क्षीरसागर यांनीही ७५ हजार मते घेतली होती. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनाही या मतदारसंघातुन तब्बल ७७ हजार मते मिळाली परंतु ताईंचा निसटता पराभव झाला. मात्र मतदारसंघातील मतदार अशा परिस्थितीतही भाजपच्या पाठिशी राहिला. गेल्या दोन विधानसभा आणि एक लोकसभा निवडणुकीत भाजपची कामगिरी पाहता बीड विधानसभा मतदारसंघाचा खरा दावेदार भाजपच आहे. २०१६ च्या नगर पालिका निवडणूकीत मी स्वतः भाजपकडून निवडणूक लढवत एकट्या बीड शहरात १० हजार मते घेतली. २००९ पासून भाजपचा आणि गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचा एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून पक्षाच्या विचारांशी प्रामाणिक आहे. भाजप अल्पसंख्याक मोर्चाचा जिल्हाध्यक्ष , प्रदेश उपाध्यक्ष आणि प्रदेश महामंत्री अशा पदांवर काम केलेले आहे. भाजपमध्ये संघटनात्मक बांधणीला महत्त्व असून त्यात एक सच्चा कार्यकर्ता म्हणून नेहमीच पक्ष विचाराला प्राधान्य दिले. पंकजाताई आणि प्रितमताईंने टाकलेल्या विश्वासाला कधीच तडा जाऊ दिला नाही. आजही ताईंचा शब्द माझ्यासाठी प्रमाण असून देशातील राजकीय वारे कसेही असले आणि ते कोणत्याही दिशेने असले तरी सलीम जहाँगीर शेवटच्या क्षणापर्यंत कधीच मागे हटणार नाही. दुसऱ्यांसारखी गद्दारी माझ्या रक्तात नाही.दाखवायचे एक आणि करायचे एक हे माझ्या ईमानाला कधीच पटणार नाही. माझा पक्ष, माझा नेता आणि माझा पाठीराखा म्हणजे एकमेव पंकजाताईच आहेत. ताईंचा विश्वासघात करू पाहणाऱ्यांनी बीड विधानसभेची स्वप्ने पाहू नयेत. महायुती असूनही लोकसभा निवणुडकीत भाजपने एकाकी लढत दिली. सगळ्यांनी प्रयत्न केले असते आणि एक दिलाने काम केले असते तर सहा हजाराचा फरक राहिला नसता. महायुतीचे ढीगभर नेते शहर , ग्रामीणमध्ये आहेत. मात्र सगळ्यांनी हात दिला आणि विश्वासघात केला. आज तेच महायुतीच्या घटक पक्षातून उमेदवारी मागत आहेत. लोकसभेत दगाफटका करणारे आता कोणत्या तोंडाने उमेदवारी मागत आहेत ? याचे त्यांनी चिंतन करावे. ज्यांचा पराभव करण्यासाठी प्रयत्न केला आज त्यांच्याच घरात जाऊन तुम्ही उमेदवारी मागत आहात हे तुम्हाला शोभतेय का ? जनाची नाही तर मनाची तरी ठेवा असेही भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी म्हटले आहे.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अंभोरा पोलीस ठाण्याचे पथसंचलन

## शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी केले जनतेस आवाहन



म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलीस स्टेशन हद्दीत या वर्षी मोठ्या उत्साहात ८४ गावात गणेशोत्सव साजरा होत आहे. गणेशोत्सव शांततेत व आनंदात पार पाडवा यासाठी अंभोरा पोलीस स्टेशन मार्फत महत्वाच्या गावांमध्ये पथसंचलन करण्यात येत आहे. त्यापैकी धानोरा, धामणगाव, दौला वडगाव, अंभोरा इत्यादी गावांमध्ये पथसंचलन करण्यात आले आहे.

अंभोरा पोलीस स्टेशन मार्फत गणेश भक्तांना आवाहन केले गणेशोत्सव सुरक्षित पार पाडणेकरिता सार्वजनिक गणेश मंडळानी पोलीस स्टेशनची परवानगी घेऊन शानसनाच्या नियम व अटी प्रमाणे उत्सव साजरा करावा. गणेशोत्सव साजरा करण्यापाठीमागील उद्देश काय होता याची जाणीव ठेवून समाज उपयोगी रक्तदान शिबीर, गरजू विद्यार्थ्यांना मदत, प्रवचन, कीर्तन, जनजागृती शिबीर, आरोग्य सुविधा शिबीर, महापुरुष व्याख्यान, अन्नदान, संस्कार शिबीर, समाज प्रबोधन, गावाच्या सुरक्षितेसाठी बसविणे इत्यादी सामाजिक उपक्रम राबविण्यास प्रथम प्राधान्य द्यावे. गणेशोत्सवा दरम्यान अथवा मिरवणुकीत कोणतेही अश्लील गाणे, चित्रपटातील गाणे लावून त्यासमोर अश्लील नृत्य केले जाणार नाही याची खबरदारी घ्यावी. सुप्रीम कोर्ट व शासनाच्या निर्देशाप्रमाणे ७५ डेसिबल पेक्षा जास्त आवाजाचे कोणतेही वाद्य / ध्वनीक्षेपक लागणार नाही. इतर जाती/ धर्माच्या भावना दुखावतील असे कोणतेही गाणे अथवा भाष्य करू नये. डीजे / डॉल्बीच्या मोठ्या आवाजामुळे वयस्कर व्यक्ती, आजारी व्यक्ती यांचे आरोग्यावर दुष्परिणाम होतं असून हृदय आजाराचे प्रमाण वाढत आहे. आपल्या लोकांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हानिकारक आवाजाचे साउंड सिस्टीम लावण्यापेक्षा पारंपारिक वाद्य लावण्यास प्राधान्य द्यावे. आपले मागील हेवेदावे बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र येऊन मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा करुन आपल्या उदात्त व आदर्श संस्कृती प्रदर्शन करावे. थोडक्यात आपल्यामुळे इतरांना त्रास होईल असे कोणतेही कृत्य करू नये. आपण अंभोरा पोलीस स्टेशन मार्फत प्रत्येक सार्वजनिक गणेश मंडळाच्या सुरक्षेसाठी दत्तक योजने अंतर्गत पोलीस अंमलदार / होमगार्ड यांना नेमूण त्या मंडळाची सुरक्षेची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

हे पथसंचलन घेण्याचा हेतू शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी व नको त्या गोष्टींना आळा बसेल व आपण शासनाने दिलेले नियम व अटींचे पालन करुन आम्हाला सहकार्य करावे अंभोरा पोलीस ठाणे आपला गणेशोत्सव सुरक्षित व उत्साहात पार पाडावा यासाठी सदैव तत्पर आहे.

सपोनि मंगेश साळवे
–अंभोरा पोलीस ठाणे

# ज्ञानराधाच्या ठेवीदारांची उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल

पाटोदा । प्रतिनिधी




ज्ञानराधा मल्टिस्टेट को – ऑप . सोसायटी लिमिटेडने ठेवीदारांच्या मुदत ठेवी परत न दिल्यामुळे सदरील मल्टिस्टेट को – ऑप . सोसायटीच्या संचालका विरोधामध्ये शिवाजीनगर पोलीस स्टेशन बीड येथे ठेवीदारांनी कलम १२० – ब , ४०६ , ४० ९ , ४२० व महाराष्ट्र ठेवीदारांच्या ( वित्तीय संस्था मधील हितसंबंधाचे संरक्षण ) अधिनियमन १९९९ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे तसेच जालना व बीड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झालेला आहे . परंतु गुन्हा दाखल होऊनही ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासंबंधात कुठलीच कारवाई करण्यात आलेली नाही त्यामुळे याबाबत ठेवीदारांच्या वतीने अर्जुन कचरू भाकरे व इतर १८६ ठेवीदारांनीमा . उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे अॅड . नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांच्यामार्फत रिट याचीका स्टॅम्प क्र . २५२४ ९ / २०२४ दाखल केलेली असुन सदरील याचीकेमध्ये १. सचिव सहकार मंत्रालय भारत सरकार . २. अतिरिक्त सचिव केंद्रीय सहकार सोसायटी नोंदणी कार्यालय . ३. सचिव सहकार मंत्री केंद्रसरकार . ४. केंद्रीय निबंधक मल्टिस्टेट को – ऑप . सोसायटी नवी दिल्ली . ५. गर्वनर भारतीय रिर्जव बँक . ६. जिल्हाधिकारी बीड यांना प्रतिवादी केलेले आहे . तसेच सदरील ज्ञानराधा मल्टिस्टेट को – ऑप . सोसायटी लिमिटेड सोसायटी याची कारभाराची संपूर्ण चौकशी करून ठेवीदाराच्या ठेवी परत करण्याचे निर्देश प्रतिवादी ला देण्यात यावे अशी विनंती केली आहे .

# हिंदी दिवस सप्ताहानिमित्त अनुवाद लेखन स्पर्धा

पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १० सप्टेंबर रोजी हिंदी विभागाच्या वतीने हिंदी दिवस सप्ताहानिमित्त अनुवाद लेखन स्पर्धा उत्साहात संपन्न झाली.प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये भाषांतर कौशल्ये विकसित करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आली होती. अनुवाद लेखन स्पर्धेत ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

हिंदी दिवस सप्ताहानिमित्त विभागामार्फत १२ सप्टेंबर रोजी हिंदी शुद्धलेखन स्पर्धा, १३ रोजी निबंधलेखन स्पर्धा व १४ रोजी



अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी हिंदी विभागप्रमुख डॉ. न. पु. काळे, डॉ. दिलीप गिऱ्हे, प्रा. रवींद्र शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पशुरोग निदान शिबीरात २१०० जनावरांची तपासणी



धारूर । प्रतिनिधी

जय किसान गणेश मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहेत (ता.११) रोजी सकाळी सात ते बारा या दरम्यान पशुधन आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात २१०० पशु ची तपासणी व आत्यावशक शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

येथील कसबा भागातील गणेश मंडळाच्या वतीने विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे (ता.११) रोजी आयोजित केलेल्या पशुरोग निदान शिबिरात २१०० पशुधनाची तपासणी व उपचार करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन प्रा.विजयकुमार शिनगारे व ऍड परमेशवर शिनगारे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.चंबरें,डॉ शेजुळ व पशुधन पर्यवेक्षक.नखाते,पारवे,जयराम वायकर,घुले,लगसकर यांच्या सह कर्मचारी उपस्थित होते. सकाळी सात ते दुपारी बारा वाजेपर्यंत झालेल्या शिबिरात २१०० जनावरांची तपासणी करून उपचार करण्यात आले. दोन म्हशींवरील व एक बैलावर अत्यावश्यक शस्त्रक्रिया करण्यात आल्या. जंतनाशक लस, गोचिड गोमाशा निर्मूलन लसीकरण, घटसर्प, फऱ्या रोग, शेळ्या मेंढ्यासाठी लसीकरण, वंध्यत्व तपासणी, गर्भतपासणी आदी लसीकरण व तपासण्या करण्यात आल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयकिसान गणेश मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला

## घरोघरी ज्येष्ठा गौरींचे मनोभावे पूजन;आज होणार विसर्जन



माजलगाव । प्रतिनिधी

गणेश चतुर्थीला गणपतीचे उत्साहात आगमन झाल्यानंतर दि २० सप्टेंबर मंगळवारी जेष्ठा गौरीचे घरोघरी आगमन झाले,तर दि २२ सप्टेंबर बुधवार रोजी घरोघरी महिलांनी जेष्ठा गौरीची मनोभावे पूजन करत मोठ्या उत्साहात सर्वत्र गौरी पूजन करण्यात आले.तर आज दि १२ सप्टेंबर गुरुवार रोजी जेष्ठा गौरीचे विसर्जन होणार आहे.

वर्षभरापासून ज्यांच्या आगमनाची आस भाविक भक्तांना असते त्या लाडक्या गणरायाचे दि ०७ सप्टेंबर रोजी आगमन झाले. सार्वजनिक गणेश मंडळांसह घराघरात बाप्पांचे आगमन झाल्याने सर्वत्र आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.लहान मोठे सर्वच बाप्पांच्या सेवेत कसलीही कमी राहणार नाही याची काळजी घेतात. तसेच दि १० सप्टेंबर मंगळवारी जेष्ठा गौरीचे आगमन झाले. महिलांनी मोठ्या आनंदाने घरोघरी जेष्ठा गौरीचे पूजन केले.माहेरवाशिणी असलेल्या जेष्ठा गौरीचे लाड पुरविण्यात कोणतीही कमी राहणार नाही याची महिला वर्गाकडून दक्षता घेतली जात होती.जेष्ठा गौरीसाठी घरोघरी खास स्वादिष्ट फराळ बनविण्यात आला होता.काही ठिकाणी बाजारातून तयार फराळ आणण्यात आला होता.

ग्रामीण भागात महिलांनी जेष्ठा गौरींना साज शृगांर करत बाप्पा व गौरीच्या समोर बसून मनोभावे पूजा केली.सर्वत्र गणपती व जेष्ठा गौरीच्या गाण्यांनी परिसर दणाणून सोडला होता. नानाविध आकारांच्या जेष्ठा गौरींना आकर्षक साडी व दागिन्यांनी सजविण्यात आले होते.जेष्ठा गौरी पुजना नंतर आज दि १२ सप्टेंबर गुरुवार रोजी जेष्ठा गौरीचे विसर्जन होणार आहे.

# पिक विमा कंपन्या काळया यादीत टाकण्यासाठी मंत्रिमंडळाची बैठक घ्यावी-वसंत मुंडे

मुंबई । प्रतिनिधी

खरीप आणि रब्बी पिक विमा वाटप संदर्भात महाराष्ट्र शासनाकडून पी एम एफ बी वाय २०२२/सी आर ६२/११ए ,दि.१३/०७/२०२२ ला केंद्र सरकारकडे आज तागायत कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या प्रधानमंत्री पिक विमा योजनेसाठी ४ वेळा पत्र व्यवहार करूनही विमा कंपन्या शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे वर्ग करण्यास तयार नाहीत कारण शासनाचे विमा कंपन्यावर नियंत्रण नाही आरोप ओबीसी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. महाराष्ट्रात सन २०१६ पासून खरीप रब्बी हंगामासाठी जिल्हा निहाय खाजगी पिक विमा कंपन्यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत प्रत्येक वर्षी जिल्हे बदलण्याची प्रक्रिया टेंडर द्वारे कंपनीची चालू असते परंतु प्रधानमंत्री पिक विमा योजना साठी वेगवेगळे निकष केंद्र व राज्य सरकारची नियमावली व पिक पेरणी पासून काढणे पर्यंत च्या कालावधीमध्ये अतिवृष्टी, वीजं कोसळणे ,नैसर्गिक आग, गारपीट, वादळ ,चक्रीवादळ, पूर ,दुष्काळ, पावसातील खंड वेगवेगळे रोग पडल्यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्नात घट झाली तर शेतकरी नियमानुसार पीकम्यास पात्र असतात असे पिकाची वर्ग वारी करून खरीप व रब्बी हंगामात शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. देशातील राजकीय नेत्यांच्या व अधिकाऱ्यांच्या सहकार्य घेऊन सर्वच खाजगी पिक विमा कंपन्या शेतकऱ्यांची आर्थिक लुट करीत आहेत .



अनेक प्रकरणे तालुका न्यायालय जिल्हा न्यायालय उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात चालू असून शासनाकडे शेतकऱ्यांच्या तक्रारी पिक विमा संदर्भात आहेत परंतु कारवाई नियमानुसार केली जात नाही. केंद्र व राज्य सरकारचे कृषी पीक विमा कंपन्या संदर्भातले खाजगी धोरण जबाबदार आहे, कारण पिक विमा कंपन्यांना २० ते ३५ टक्के कमिशन मिळते . पिक विमा कंपन्यावर राज्य व केंद्र सरकार कठोर भूमिका घेत नसल्यामुळे सर्व बाजूने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडलेला आहे.वेगवेगळे नियम दाखवून पिक विमा कंपन्या स्वतःचा स्वार्थ साधित असून त्यामध्ये अधिकारी व लोकप्रतिनिधी मंत्री यांचा हात असल्याचा आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला. केंद्र सरकारचा अर्धा हिस्सा व राज्य सरकारचा अर्धा हिसा एकत्र करून नियमानुसार पीक विमा संदर्भात निकष आहेत, त्यामध्ये विमा शेतकऱ्यांना पिकाच्या टक्केवारी नुकसान भरपाई देण्यात येते. याच गोष्टीचा गैरफायदा पिक विमा कंपनीने धेऊन करोडो रुपये शेतकऱ्याच्या शासनाच्या पिक विमा योजनेमध्ये कमावले आहेत. महाराष्ट्र च्या त्रिमूर्ती सरकारने एक रुपयाचा पिक विमा उतरण्यासंदर्भात शेतकऱ्यांना गाजर दाखवलेले आहे, परंतु आज तागायत शेतकऱ्यांनी अनेक प्रकरणे पिक विमा संदर्भात माननीय उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाचे पिक विमा शेतकऱ्यांना वाटप करण्याच्या आदेशा राज्य सरकारकडे देऊन ही पिक विमा कंपन्या न्यायालयाच्या आदेशाचे पालन करीत नाहीत. तसेच केंद्र व राज्य सरकारचे सर्वच बाजूंनी शेतकऱ्यासंदर्भात शेतीमालाचे आयात निर्यात धोरण चुकीचे आहे , शेतकऱ्याचा माल तयार झाला की आयात माल परदेशातून करून देशातील शेतकऱ्यावर अन्याय केला जातो व शेतीमालाचे भाव पाडले जातात परदेशातील व्यापाऱ्याकडून टक्केवारी मिळाली जाते हे खरे कारण आहे व देशातील व्यापाऱ्यांना शेतीमाल भाव पाडून खुश करणे व शेतकऱ्यावर अन्याय करणे हे खरे धोरण केंद्र व राज्य सरकारच्या भाजपच्या सरकारचे असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला. बोगस खते बी बियाणे कीटकनाशके संदर्भात शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्याचे कायद्यात तरतूद नाही तरीही केंद्र व राज्य सरकार कायदा करण्यास अकार्यक्षम आहे. १८% शेती अवजारे खते बि बियाने कीटकनाशके औषधी व इतर साहित्य यावर जीएसटी कर लावल्यामुळे शेतकरी सर्व बाजूने आर्थिक संकटात सापडलेला आहे. महाराष्ट्रातील पिक विमा कंपन्यानी पिकाचे नुकसान झाल्यास ई पिक पाहणी पंचनामे नोंदणी शक्तीची केली, ७२ तासाच्या ऑनलाइन तक्रार पिक विमा कंपनीकडे करण्यासंदर्भात अट टाकली तसेच महाराष्ट्रातील सर्व शेतकरी सुशिक्षित नाहीत व मोबाईलचे वापरण्यासंदर्भात कमी ज्ञान आहे तरी शासन कोणतीही दखल शेतकऱ्यासंदर्भात घेत नाही उलट कंपनीची बाजू सरकार घेते. शेतकऱ्याला अँड्रॉईड मोबाईल द्वारे नोंद कशी करावी ॲप कसे चालू करावे याचे ज्ञान नाही. पिक विमा कंपन्यांचे व कृषी खात्याचे कर्मचाऱ्यांचे शेतकऱ्यांना या संदर्भात सहकार्याची भूमिका नाही , ई सेवा केंद्रावर शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन आर्थिक लूट केली जात आहे तरीही शासन स्तरावर कारवाई ई सेवा केंद्रावर व पिक विमा कंपन्या शेतकऱ्याचा पैसा वापरीत आहेत तरीपण केंद्र व राज्य सरकार कडून पिक विमा कंपनीवर कडक कायदेशीर कारवाई केली जात नाही. कोरोना काळातील व आजतागायत केंद्र व राज्य सरकारच्या एनडीआरएफ व एसडीआरएफ निकषाचे पालन पिक विमा कंपन्या करीत नाहीत . करिता महाराष्ट्र शासनाने तात्काळ की पिक विमा कंपन्या काळा यादी टाकून मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये ठराव घेऊन केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी पाठवा शासकीय कंपन्याला पिक विमा कंपन्याचे कामे देण्यात यावी अशी मागणी ओबीसी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी शासनाकडे केली आहे.


जाहीरनामा

**धारुर येथील श्रीमती ए. बी. जोंधळे २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर धारुर**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २५७/२०२४**

**आबाराव फुन्ने वि. निरंक**

अर्जदार यांनी मयत हरीबाई भ्र. जनार्धन फुन्ने मौजे धारुर ता. धारुर जि. बीड हया दिनांक ०२/०४/२०१७ रोजी फलाट नंबर ०५, मंगलमय अपार्टमेंट, सदाशिव नगर, एन– २, सिडको ता. जि. औरंगाबाद येथे मयत झाल्याचे नमुद केले आहे.

त्यांच्या पश्चात अर्जदार आबाराव पिता जनार्धन फुन्ने, वय ४७ वर्षे, धंदा व्यवसाय, रा. धारुर ता. धारुर जि. बीड ह. मु. मंगलमय अपार्टमेंट, फलॅट नंबर ०५, सदाशिवनगर, एन– २, सिडको, औरंगाबाद यांनी अर्जदार हा मयताचा मुलगा या नात्याने त्यांना शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता, व इतर महत्त्वाच्या कामकाजाकरीता, वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार ही मयत हरीबाई भ्र. जनार्धन फुन्ने यांचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत हरीबाई भ्र. जनार्धन फुन्ने यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : ०५/०९/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले
पुढील तारीख :११/१०/२०२४

स्वाक्षरित
सी.के.पवार
क. लिपीक

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर धारुर

# जि.प.शाळा वाचवण्यासाठी नांदूरघाटकर व विद्यार्थी पुन्हा शिक्षणाधिकाऱ्यांच्या दालनात

## उपसंचालकांनी आदेश देऊनही अधिकाऱ्यांची टोलवाटोलवी; शाळा समिती व ग्रामस्थ पहिली ते सातवी जिल्हा परिषद शाळा पुनर्जीवित करण्यासाठी ठाम

**नांदुर घाट । प्रतिनिधी**

सरकार बोलते सरकारी शाळा वाचली पाहिजे आणि बीड जिल्ह्यामध्ये हेच शासनामध्ये अधिकारी जिल्हा परिषद शाळा मोडण्यासाठी व बंद करण्यासाठी पुढाकार घेत असल्याचे दिसून येत आहे नांदुर घाट येथे १८६५ साली स्थापन झालेली जिल्हा परिषद शाळा पहिली ते सातवी २०१६ पर्यंत सुरळीत व चांगली चालत होती या ठिकाणी कन्या शाळा व केंद्रीय प्राथमिक शाळा अशा दोन जिल्हा परिषद शाळा आहेत परंतु २०१६ नंतर चुकीचे कारणे करून संस्थेबरोबर राजकीय पुढार्यांच्या तडजोडीने पाचवी सहावी सातवी वर्ग विद्यार्थी कमी करून खाजगी संस्थेत घातले व शाळा पहिली ते चौथी चालू ठेवली परंतु या ठिकाणी मान्यता पहिली ते सातवी आहे परंतु पाचवीचा वर्ग जूनमध्ये सुरू करून देखील त्याला टॅब दिला नाही तसेच महत्त्वाचे म्हणजे गटशिक्षणाधिकारी यांना मार्च मध्येच शालेय शिक्षण समितीचा ठराव तसेच ग्रामसभेचा ठराव व विद्यार्थ्यांची यादी व पालकांची मागणी दिली होती वर्ग चालू झाला तीन महिने झाले वर्ग सुरळीत सुरू आहे परंतु त्याला टॅब नसल्यामुळे अडचणी येत होत्या मागील महिन्यात विद्यार्थ्यांसह पालक व शालेय समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात शाळा भरवली त्यावेळी लेखी स्वरूपात सांगण्यात आले विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही आम्ही उपसंचालक यांना मार्गदर्शन मागून घेतो पत्रव्यवहार करून यावर शालेय शिक्षण समिती यांना पत्र देखील आले व उपसंचालक यांनी स्पष्ट आदेश केले की



हे अधिकार सिओ यांना आहेत तात्काळ प्रकरण निकाली काढावे तरी देखील काही हालचाल दिसेना म्हणून दुसऱ्या वेळेस दिनांक ९ रोजी सर्व विद्यार्थी पालक जिल्हा परिषदेच्या प्रांगणात दारात बसले यावर शिक्षण अधिकारी काही उत्तर द्यायला तयार होत नाही आम्ही सविस्तर प्रस्ताव तयार करतोत आणखी व आता संचालक यांना पाठवतो व तुमची मागणी करण्याचा प्रयत्न करतो तसेच त्या विद्यार्थ्यांचे नवोदयचे नुकसान होऊ नये म्हणून जिल्हा परिषद शाळेला यु-डायस दुसऱ्या कोडवर जॉईन करतो व शाळा त्याच ठिकाणी भरवा हे तात्पुरतं आश्वासन दिले व त्यांचे म्हणणे आले एक किलोमीटरवर तीन संस्था आहेत गावात परंतु या संस्थेला जिल्हा परिषद शाळा असताना पाचवीच्या वर्गाची परवानगी दिलीच कशी हा प्रश्न विचारला असता शिक्षण अधिकारीच म्हणतात चुकीच्या पद्धतीने आधी झाले आहे म्हणजे खाजगी कोणत्याही संस्थेला लगेच परवानगी मिळते आणि गावकरी जिल्हा परिषद शाळा वाचवण्यासाठी प्रयत्न करत असताना त्यांना एवढा त्रास दिला जात आहे हे दुर्दैव आहे.

नऊ तारखेला शिक्षणाधिकारी यांच्या दालनात विद्यार्थी व पालक ग्रामस्थ बसल्यावर जुने शाळेचे रेकॉर्ड मागितल्यावर ते देखील मुख्याध्यापकाने तात्काळ उपलब्ध केले परंतु एकाही प्रश्नाचे उत्तर शिक्षणाधिकारी देत नव्हते नेमके त्यांच्यावर कुणाचा दबाव आहे ही कुणाची खाजगी शाळा नाही ही ◀◀ पान ३ वर

नांदूर घाट जिल्हा परिषद शाळा जुनीच आहे त्याला मान्यता देखील आहे नवीन मान्यता आम्ही मागितलीच नाही पुनर्जीवित शाळा करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत व प्राथमिक शिक्षण पहिली ते पाचवी आहे हा शासनाचा जीआरएच आहे तरी देखील पाचवीच्या विद्यार्थ्यांना हे अडचणी कशासाठी करत आहेत ही कुणाची वैयक्तिक शाळा नाही सरकारचे आहे तरी देखील या सरकारी अधिकाऱ्यांना नेमका कुणाचा एवढा दबाव आहे नेमके राजकीय पुढारी ते कोण व संस्थानिक ते कोण गोरगरिबांची लेकरं यांना शिकून द्यायची नाहीत का? सर्व नियमानुसार कागदपत्राची पूर्तता केली शाळेत वर्ग खोल्या आहेत शिक्षक आहेत फक्त पुढील वर्गाचा टॅब यांनी बंद केला तो चालू करायचा ऑनलाईन एवढेच आहे तरी देखील अडचणी का गावची जुनी शाळा पहिली ते सातवी सुरू होणारच व ते करूच.
अमोल जाधव ( शा.स. अध्यक्ष )

नांदूर घाट ची जिल्हा परिषद शाळा ही पूर्वीचीच आहे व या अधिकाऱ्यांनी नंतर नांदूर मधील तीन संस्थेला पाचवीच्या वर्गाची मान्यता कोणत्या निकषावर दिली कोणत्या नियमाने दिली याची सविस्तर माहिती मागवली आहे व त्यांच्या निकषानुसार नुसार पटसंख्या आहे का? हे देखील अधिकाऱ्यांनी आता पाहावे व चुकीच्या पद्धतीने त्यांना मान्यता दिली असेल तर ती रद्द का होत नाही यासाठी आम्ही आता कोर्टात जाणार आहोत आम्ही आमच्यासाठी नाही गोरगरिबांच्या लेकरासाठी व गावाच्या सरकारी शाळेसाठी झटत आहोत सर्व नियमात असून हे अधिकारी विरोध करत असतील तर या मागील खाजगी संस्थांचे सुद्धा रेकॉर्ड सिद्ध करावे लागेल.
प्रमोद कसबे ( शा.स.उपाध्यक्ष )

दोन दिवसात पूर्ण रेकॉर्ड सह प्रस्ताव आणखी वरिष्ठ कार्यालयाला तयार करून पाठवतो जिल्हा परिषद शाळा नक्कीच पूर्ववत सुरू होईल १५ तारीख नवोदय फॉर्म भरणे शेवट आहे या पाच दिवसात या सर्व विद्यार्थ्यांचे नवोदय फॉर्म भरले जातील तसेच या विद्यार्थ्यांना आणखी शिकवण्यासाठी अतिरिक्त तात्काळ दोन शिक्षक नांदूर जिल्हा परिषद शाळेला दिले जातील व लवकरच नांदूरची जिल्हा परिषद शाळा पुनर्जीवी होईल असे आश्वासन आज जिल्हा परिषद शाळा नांदूर येथे येऊन देत आहे.
बेडसकर ( गटशिक्षणाधिकारी केज )

# ॲड.सुभाष राऊत यांचा रिपाइं कार्यालयात सत्कार

## रिपाइंकडून चळवळीच्या कार्यकर्त्यांची दखल

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड.सुभाष राऊत यांची राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल बुधवार (दि.११) सप्टेंबर रोजी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या हस्ते रिपाइंच्या जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात रिपाइं पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष ॲड.सुभाष राऊत यांचा सत्कार करण्यात आला.



बीड जिल्ह्यातील चिंचोली माळी येथील रहिवाशी असलेले व पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांचे निष्ठावंत व अखिल भारतीय समता परिषदेच्या माध्यमातून विविध आंदोलनात सक्रिय सहभाग घेऊन यशस्वी करण्याचे काम करणारे ॲड. सुभाष राऊत यांच्या कार्याची दखल घेऊन पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी त्यांची राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी निवड केली आहे. निवडीबद्दल रिपाइंच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राजू जोगदंड, किसन तांगडे, अविनाश जोगदंड, रणजीत शिनगारे, सादेक पठाण, शेख शफिक भाई, प्रभाकर चांदणे, दिलीप खंदारे, विलास जोगदंड, धम्मा पारवेकर,आप्पा मिसळे, प्रा. बाळासाहेब गव्हाणे, दयानंद उजगरे,अक्षय कोकाटे, नामदेव वाघमारे,सोनू वडमारे, योगेश गायकवाड, जमील भाई शेख, बबलू जोगदंड आदी उपस्थित होते.

# बीडमध्ये २९ सप्टेंबर रोजी मराठवाडा केसरी भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन -राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने दिनांक २९ सप्टेंबर रविवार रोजी बीडमध्ये ''मराठवाडा केसरी'' भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले आहे. मागील शर्यती दरम्यान घोषणा केल्या प्रमाणे सोनालीका ट्रॅक्टर पहिले बक्षीस ठेवण्यात आले आहे. बैलगाडा शर्यत शौकीन शेतकरी बांधवांनी रीतसर नाव नोंदणी करून, या शर्यतीत बहुसंखेने सहभाग घ्यावा. असे आवाहन शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी केले आहे.



बैलगाडा शर्यत महाराष्ट्रातील पारंपारिक हौसी खेळ आहे. गावोगावी सन उत्सव किंवा विशेष कार्यक्रमाच्या निमित्ताने शेतकरी बांधवाना प्रोत्साहित करण्यासाठी बैलगाडा शर्यतीचे अनेक गावात नियोजन केले जाते. बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील खेडोपाडी बैलगाडी शर्यत लोकप्रिय झाली. हौसी शेतकऱ्यांसाठी यापूर्वी दोन वेळा राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. उदंड प्रतिसाद लक्षात घेऊन याही वर्षी भव्य बैलगाडा शर्यतीचे भव्य बक्षीसासह आयोजन केले आहे. बीड शहरालगत बीड अहमदनगर हायवे, तळेगाव शिवारात या स्पर्धा संपन्न होतील. प्रथम बक्षीस सोनालिका ट्रॅक्टरसह अन्य रोख बक्षिसे देण्यात येतील. नोंदणीकृत स्पर्धकांनाच शर्यतीत सहभाग घेता येईल. संघर्षयोद्धा भाजपा जनसंपर्क कार्यालय, बीड येथे नाव नोंदणी सुरु आहे. अशी माहिती राजेंद्र मस्के मित्र मंडळाने कळवली आहे.संपर्क ९९२११९४९५४, ९१३०८८७८८८, ९३५९००५८७९, ९८६०९११०९९

# कृषीमंत्री मुंडे यांनी आष्टीला पाच कोटी ७५ लक्ष रुपयाच्या कृषीभवनाला दिली मंजुरी-आ.आजबे

**आष्टी । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांसाठी विविध योजना महाराष्ट्र राज्य कृषी विभागा अंतर्गत तालुका कृषी अधिकारी कार्यालय मार्फत राबवल्या जातात त्यासाठी एकाच छताखाली सर्व अधिकाऱ्यांचे कार्यालय असावे व शेतकऱ्यांची हेडसांड होऊ नये या बाबींची दखल घेत आ बाळासाहेब आजबे यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालय व कृषीभवनासाठी कृषिमंत्री ना धनंजय मुंडे यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता त्यास आज पाच कोटी ७५ लाख रुपयांच्या इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली याबद्दल शेतकरी बांधवांच्या वतीने आपण उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, कृषीमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे विशेष आभार मानण्यात आले आहेत.



आष्टी तालुक्यासाठी अद्यावत तालुका कृषी भावन असावे असे आपले स्वप्न आहे त्यासाठी प्रस्ताव दाखल करण्याचे सूचित केले होते त्यानुसार राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार कृषिमंत्री नामदार धनंजय मुंडे साहेब यांच्याकडे पाठपुरावा करून ९ सप्टेंबर २०२४ रोजी कृषी विभागाच्या वतीने पाच कोटी ७५ लाख रुपये च्या प्रशासकीय मान्यता आदेश काढण्यात आला आहे यामध्ये तालुका कृषी अधिकारी कार्यालय मंडळ अधिकारी कार्यालय व कृषी भवन शेतकऱ्यांसाठी या ठिकाणी सर्व सोईयुक्त असे कृषी भवन बांधण्यात येणार आहे यामध्ये शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग व इतर संग्रहालयाचाही समावेश करण्यात येणार आहे ,शेतकऱ्यांसाठी झटणारे शेतकरी पुत्र म्हणून आमदार बाळासाहेब आजबे यांची ओळख असणारे कर्तव्यदक्ष आमदार आजबे यांनी पुन्हा एकदा शिक्का मोर्तब केले आहे, लवकरच या कामाची निविदा प्रसिद्ध होऊन कामास सुरुवात होणार आहे त्यामुळे अधिकाऱ्यांबरोबरच शेतकऱ्यांना विविध सुविधा या एकाच छताखाली मिळणार आहेत शेतकऱ्यांसाठी शासनाच्या वेगवेगळ्या योजना राबवल्या जाणार असून त्यामध्ये सुसूत्रता येण्यास मदत होणार आहे असे शेवटी आ आजबे यांनी बोलतांना सांगितले.

# ॲड.नरसिंह जाधव व शिवभूषण जाधव यांनी पवार यांची भेट घेतली





**पाटोदा । प्रतिनिधी**

आष्टी पाटोदा व शिरूर मतदार संघातून ॲड . नरसिंह लक्ष्मणराव जाधव राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष शरद पवार विधी सेलचे उपाध्यक्ष तथा मराठवाडा प्रमुख यांनी आज आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांची विद्या प्रतिष्ठान बारामती येथे भेट घेऊन आष्टी मतदार संघातील त्यांच्या मतदार गाव भेटी संदर्भामध्ये मतदारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासंदर्भामध्ये काय कल आहे या संदर्भात माहिती दिली . सोबत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे पाटोदा तालुका अध्यक्ष शिवभूषण जाधव हे देखील उपस्थित होते . आष्टी मतदारसंघांमध्ये विधानसभेच्या होऊ घातलेल्या निवडणुकीमध्ये आदरणीय शरदचंद्रजी पवार पक्षाच्या ◀◀ पान ३ वर



आष्टी : माजी मंत्री सुरेश यांच्या पत्नी प्राजक्तताई धस यांनी भिमराव गुरव यांच्या निवासस्थानी गौराईचया हळदी कुंकवास उपस्थित राहील्या..

# चित्रकला व निबंध स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलेला वाव मिळणार -फड

## कन्हेरवाडी सार्वजनिक गणेश मंडळ आयोजित चित्रकला व निबंध स्पर्धा उत्साहात साजरी

**परळी । प्रतिनिधी**

युवा नेते कन्हेरवाडीचे लोकप्रिय सरपंच राजेभाऊ फड यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या कन्हेरवाडी सार्वजनिक गणेश मंडळ यांच्या वतीने आयोजित केलेल्या ''कन्हेरवाडी फेस्टिवल'' मधे गणेश मंडळाच्या वतीने कन्हेरवाडी गावातील व परिसरातील सर्व विद्यार्थ्यांसाठी निबंध, चित्रकला व रांगोळी स्पर्धेचे आयोजन केले होते या निमित्त शालेय स्तरावर या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेचे आयोजन गावातील सोमनाथ विद्यालय व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आयोजन केले होते. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या कला





दाखवण्याचा व जोपासण्याचा प्रयत्न करण्यात आला. या स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद व सोमनाथ विद्यालय शाळेतील १०० ते १२० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेमधील विद्यार्थ्यांचे प्रथम द्वितीय व तृतीय असे नंबर काढण्यात आले व त्यांच्यासाठी युवा नेते सरपंच राजेभाऊ फड यांच्या वतीने प्रथम पारितोषिक ३१०० रू व सन्मानचिन्ह,द्वितीय पारितोषिक २१०० रु व सन्मानचिन्ह व तृतीय पारितोषिक १००१ रु व सन्मान चिन्ह असे ठेवण्यात आले असून लवकरच या विजेत्यांना याचे वितरण करण्यात येणार आहे असे मंडळाच्या वतीने सांगितले. या स्पर्धा पाहण्यासाठी गावातील तरुण युवक महिला भगिनी या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी या स्पर्धेसाठी सोमनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक शिंदे सर, राजूरकर सर , आंधळे सर, क्षीरसागर सर, थोरात सर, पाटील सर, सौ.शिंदे मॅडम ,सौ. साखरे मॅडम,सरवदे सर यांच्यासह जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक कोनेरी सर, रोडे मॅडम ,नागरगोजे मॅडम, गोपनपाळे मॅडम, ◀◀ पान ३ वर

# आ.नितेश राणेंविरूद्ध गुन्हा दाखल करा पीडित मुलीच्या कुटुंबाला न्याय द्या

## ऑल इंडिया पँथर सेनेचा अंबाजोगाईत जनआक्रोश मोर्चा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने आ.नितेश राणेंविरूद्ध गुन्हा दाखल करा, पीडित मुलीच्या कुटुंबाला न्याय द्या यासह विविध मागण्यांसाठी शहरातील उपजिल्हाधिकारी कार्यालयावर मंगळवार, दिनांक १० सप्टेंबर रोजी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाचे नेतृत्व जीवन गायकवाड व अक्षय भुंबे यांनी केले. हा मोर्चा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातून निघून तो बसस्थानक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे उपजिल्हाधिकारी कार्यालयावर




धडकला. यावेळी सरकारच्या जनविरोधी धोरणे व कार्यपद्धती विरोधात प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली.

ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने काढण्यात आलेल्या जनआक्रोश मोर्चात हालगीच्या निनादात सातशेहून अधिक महिला, युवक, पँथर सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते घोषणा देत, फलक व झेंडे घेऊन सहभागी झाले. उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर सदरील मोर्चाला जीवन गायकवाड, अक्षय भुंबे, नितीन गोदाम, मिनाताई लोंढे, बादल तरकसे यांनी संबोधित केले. या प्रसंगी मोर्चेकऱ्यांनी दिलेले निवेदन नायब तहसिलदार यांनी स्विकारले. सदरील निवेदनात नमूद केले आहे की, १) भाजपाचे आ.नितेश राणे यांनी एका जाहिर कार्यक्रमात वादग्रस्त वक्तव्य केल्यामुळे तमाम मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या आहेत. अशा जातीयवादी, धार्मिक तेढ निर्माण ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# भ्रष्टाचाराचे आणि महिलांच्या असुरक्षिततेचे संकट दूर होऊ दे -अमोल कोल्हे

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यामध्ये लवकरच विधानसभा निवडणूका होणार आहे. त्यासाठी अद्याप आयोगाने कार्यक्रम जाहीर केला नसला तरी देखील आढावा घेण्यास सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे पक्षांचा प्रचार देखील वाढला असून नेत्यांच्या सभा वाढल्या आहेत. महायुतीसह माहविकास आघाडीमधील घटक पक्ष जोरदार तयारीला लागले आहे. शरद पवार गटाकडून विधानसभेच्या पार्श्वभूमीवर शिवस्वराज्य यात्रा काढण्यात आली आहे. खासदार अमोल कोल्हे पुण्यामध्ये आले आहेत. त्यांनी पुण्याचे ग्रामदैवत असलेल्या मानाच्या पहिल्या कसबा गणपतीचे दर्शन घेतले.यानंतर ते पत्रकारांशी संवाद साधत होते.

अमोल कोल्हे म्हणाले, आज पुण्यातील गणपती बाप्पांचे दर्शन घेतलं आणि गणपती बाप्पाला मागणं केलं की जे महाराष्ट्रातील गुलामीचं, भ्रष्टाचाराचा आणि महिलांच्या असुरक्षिततेचे जे संकट आहे ते दूर होऊ दे आणि महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांचं आणि तरुणांचं स्वाभिमानी सरकारी येऊ दे,

पुढे ते म्हणाले की, सध्याच्या महायुती सरकारमध्ये एक वाक्यता दिसत नाही त्यांनी जाहीर केलेला योजनांची वेगवेगळी नाव समोर येत आहेत. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्यावरील देखाव्यामध्ये एका उपमुख्यमंत्र्याचा फोटो नाही, ही गोष्ट आपण पाहिली यावरून महायुतीमधील नेत्यांमध्ये एक वाक्यता नसल्याचे अधोरेखित झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील या भ्रष्टाचारी सरकारला जनता वैतागली आहे. नुकत्याच करण्यात आलेल्या पाहणीत देखील महाराष्ट्राच्या जनमानसामध्ये महाविकास आघाडी आहे हे स्पष्ट झाले आहे. बारामती



मधील मेडिकल कॉलेजच्या कार्यक्रमांमध्ये शासकीय प्रोटोकॉल पाळला गेला नाही, अशी खंत खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली आहे. त्याबाबत बोलताना अमोल कोल्हे म्हणाले, यापूर्वी देखील महायुतीच्या नेत्यांनी बालेवाडीमध्ये लाडकी बहीण योजनेचा निधी वितरणाचा जो कार्यक्रम घेतला होता त्याला महाविकास आघाडीच्या नेत्यांना डावलण्याचा प्रयत्न केला. मात्र कोंबडं कितीही झाकलं तरी महाविकास आघाडीचा सूर्य उगवल्याशिवाय राहणार नाही, असं अमोल कोल्हे म्हणाले. सध्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षामध्ये येण्यासाठी खूप जण इच्छुक असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. याबाबत अमोल कोल्हे म्हणाले, महाराष्ट्राचा जनमानस काय आहे हे सर्वांना कळून चुकला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील जनता ही फोडाफोडीच्या राजकारणाला आणि खोक्याच्या राजकारणाला अजिबात थारा देणार नाही, हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षामध्ये येणाऱ्यांची रांग लागली आहे, हे स्वाभाविक आहे.

सध्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षांमध्ये येण्यासाठी खूप जण इच्छुक असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. याबाबत अमोल कोल्हे म्हणाले, महाराष्ट्राचा जनमानस काय आहे हे सर्वांना ( –ेश्र घेश्रहश)कळून चुकला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील जनता ही फोडाफोडीच्या राजकारणाला आणि खोक्याच्या राजकारणाला अजिबात थारा देणार नाही, हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षामध्ये येणाऱ्यांची रांग लागली आहे, हे स्वाभाविक आहे.

पाच वर्षांपूर्वी भाजपसोबत जाणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. त्यावेळी भाजपकडून मेगा भरती झाल्याचे बोललं जाते. त्यावर भाजपची ती मेगा भरती होती की सूज होती हे आगामी काळात कळालं आहे. पावडर खाऊन बनवलेली बॉडी आणि पवार साहेबांना सोडून गेलेला नेता राजकारणात फारसा टिकत नाही. हे आपण पूर्वीपासून पाहिला आहे, असा टोला अमोल कोल्हे यांनी अजित पवारांचे नाव न घेता लगावला. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिरूर लोकसभा मतदारसंघांमध्ये काही आमदार राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटामध्ये सक्रिय असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे शिरूरमध्ये नेमका कोणता पॅटर्न राबवणार असं विचारलं असता अमोल कोल्हे म्हणाले शिरूरमध्ये फक्त एकच पॅटर्न चालतो तो म्हणजे शरद पवार साहेब सांगतील ते धोरण आणि बांधतील ते तोरण हाच पॅटर्न शिरूर मध्ये चालणार असं अमोल कोल्हे( –ेश्र घेश्रहश) म्हणाले.

# एकाच अपघाताचा दोनवेळा गुन्हे दाखल

पिंपरी – पायी रस्ता ओलांडत असलेल्या महिलेला भरधाव दुचाकीने धडक दिली. या अपघतात महिलेचा मृत्यू झाला. हा अपघात २५ ऑगस्ट रोजी दुपारी कासारवाडी येथे घडला. मात्र भोसरी पोलिसांनी दोन वेगवेगळ्या तारखांना या अपघाताबाबत दोन गुन्हे दाखल केले. यामुळे भोसरी पोलिसांचा गलथान कारभार समोर आला आहे.

मुन्नी बेगम वकील अहमद (वय ४४) असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी वकील अहमद हजरत अली (वय ४९, रा. कासारवाडी. मूळ रा. उत्तर प्रदेश) यांनी मंगळवारी (दि. १०) भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून त्याचा गुन्हा नोंदणी क्रमांक ५३९/२०२४ हा आहे. पोलिसांनी दुचाकी (एमएच १२ व्हीके ९५८९) वरील चालक विद्याधर चंद्रकांत बारटक्के (वय २८, रा. संगमवाडी, पुणे) याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांच्या पत्नी मुन्नी बेगम वकील अहमद या कासारवाडी येथे यामाहा शोरूम समोर पायी रस्ता ओलांडत होत्या. त्यावेळी भरधाव आलेल्या बुलेटने त्यांना धडक दिली. त्यामध्ये त्यांच्या पायाला व डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. यापूर्वी देखील २५ ऑगस्ट रोजी या घटनेबाबत भोसरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून त्याचा क्रमांक ५०८/२०२४ हा आहे. या गुन्ह्यामध्ये सिराज मैनुद्दीन शेख (वय २१, रा. कासारवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. या गुन्ह्यामध्ये मयत मुन्नी बेगम वकील अहमद या फिर्यादी यांच्या मावशी असल्याचे म्हटले आहे. याबाबत बोलताना भोसरीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वनाथ चव्हाण म्हणाले की, अपघाताबाबत गुन्हा दाखल झाल्याचे फिर्यादी वकील अहमद हजरत अली आणि तपास अधिकारी यांना माहिती नव्हते. दुसर्यांदा चुकीने गुन्हा दाखल झाला असल्याबाबत आम्ही न्यायालयास कळवू.

# भाजपकडून इतिहास बदलण्याचा प्रयत्न' ; सुप्रिया सुळे कडाडल्या, केंद्र सरकारवरही साधला निशाणा

बारामती

मणिपूरमधील हिंसाचाराबाबत केंद्र सरकार पूर्णपणे अपयशी ठरलं आहे. केंद्र सरकारने मणिपूरमध्ये जावं. राजकारण बाजूला ठेऊन देशाच्या हिताचं काम केलं पाहिजे. तिथल्या महिलांना आणि नागरिकांना न्याय मिळावा अशी मागणी आम्ही पंतप्रधानांना अनेकवेळा केली आहे, असं म्हणत शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. महाराष्ट्रात देखील गुन्हेगारी वाढली असं केंद्र सरकारकडूनच सांगण्यात येत आहे. राज्यातील सरकार अपयशी ठरलं आहे. काल बारामतीत घटना घडली ती दुर्दैवी आहे. अशा घटना होऊ नये असं माझं मत आहे, असं सुप्रिया सुळेंनी सांगितले. भाजपकडून इतिहास बदलण्याचा प्रयत्न आहे. भाजपचे लोक चुकीचा इतिहास मांडत आहे. मात्र आम्ही त्यांना मांडू देणार नाही, असंही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

शरद पवारांवर जनतेने प्रेम आणि विश्वास व्यक्त केला. महाराष्ट्राचा स्वाभिमान जपला पाहिजे. त्याची ही पोहोचपावती आहे. दिल्लीत शरद पवार यांच्याकडे एक हक्काचा माणूस म्हणून बघितलं जातं, पण जरी वेगळा पक्ष असला तरी आणखी एक आपला हक्काचा माणूस आहे, ते म्हणजे



नितीन गडकरी. तसेच बारामतीचा जागा कुठला पक्ष लढवणार हे अजून निश्चित झालेलं नाहीय. गणेशोत्सवानंतर यावर चर्चा होईल. कोण-किती जागा लढवणार, यावर निर्णय झाला आहे, अशी माहिती देखील सुप्रिया सुळेंनी दिली. अनेक वेळा आपल्याला अस्वस्थ करणारी परिस्थिती असते. अन्याय झाला असं वाटतं. ज्यांनी पक्ष स्थापन केला त्यांचा पक्ष काढून घेतला. हा देश संविधानानेच चालणार कुठल्याही आदर्श शक्तीच्या मनमर्जी न चालणार नाही. संविधान वाचवण्यासाठी आम्ही प्रयत्न करू, नेहमी सत्याचाच विजय होतो. काहीही झालं तरी आम्हाला न्याय मिळेल. न्यायालयाने आम्हाला लवकर न्याय द्यावा, असं असं सुप्रिया सुळेंनी सांगितले.

काही महिन्यांपूर्वी पार पडलेल्या देशातील सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीच्या निकालांनी देश आणि राज्य पातळीवर भाजपला चांगलाच धक्का दिला आहे. केंद्रात आणि राज्यात भाजप प्रणित (इगझ) आघाड्यांची मोठी पिछेहाट झाल्याचे चित्र आहे. राज्यातील एकूण ४८ लोकसभा मतदारसंघांपैकी भाजपप्रणित महायुतीला अवघ्या १७ जागांवर विजय मिळाला आहे. तर महाविकास आघाडीची ३० जागांवर सरशी झाली आहे. या निकालांनी महायुती आणि भाजपचे नेते प्रचंड अस्वस्थ झाले असल्याचेही बघायला मिळाले आहे. कारण लोकसभेचा हाच ट्रेंड आगामी विधानसभा निवडणुकीत कायम राहिला तर कदाचित महायुतीची सत्ता जाणे अटळ असल्याची शक्यता आहे.

# ठरल्याप्रमाणे विम्याचे पैसे न दिल्याने एलआयसीला द्यावी लागणार नुकसान भरपाई; अतिरिक्त ग्राहक आयोगाचा आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

विमा काढल्यानंतर त्यांच्या प्रकाराबाबत चुकीची नोंद झाली आहे. त्यामुळे विमा काढण्याच्या वेळी सांगितलेली रक्कम देता येणार नाही, अशी भूमिका घेत ठरल्याप्रमाणे विम्याची रक्कम न देणे 'एलआयसी'ला महागात पडले आहे. तक्रारदार ग्राहकाला २५ हजार रुपये नुकसान भरपाई आणि १० हजार रुपये तक्रार खर्च द्यावा, असा आदेश अतिरिक्त ग्राहक तक्रार निवारण आयोगाने दिली आहे.




याबाबत एरंडवणे येथे राहात असलेले प्रसाद कुंभोजकर यांनी दि. लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एलआयसी) विरोधात आयोगात तक्रार दिली होती. आयोगाचे अध्यक्ष जयंत देशमुख आणि सदस्या प्रणाली सावंत यांनी हा निकाल दिला. तक्रारदारांनी 'एलआयसी'चा ' पेन्शन प्लॅन जीवन सुरक्षा' हा विमा घेतला होता. त्याचे सर्व हप्ते तक्रारदारांनी नियमितपणे भरले होते. विम्याची मुदत संपत असल्याने तक्रारदारांनी पैसे मिळण्यासाठी पर्याय निवडत ठरल्याप्रमाणे पैसे देण्याचा पर्याय निवडला होता. 'एलआयसी'ने पाठवलेल्या पत्राप्रमाणे तक्रारदारांना त्यांनी निवडलेल्या योजनेंतर्गत चार लाख ६४ हजार ५०४ रुपये मिळणे अपेक्षित होते. मात्र 'एलआयसी'ने तीन लाख ९५ हजार २२१ रुपये दिले. त्यामुळे तक्रारदारांनी 'एलआयसी'शी वारंवार संपर्क करून उर्वरित रक्कम देण्याची मागणी केली. रक्कमेचा परतावा करण्याबाबत पत्रात नमूद केलेली रक्कम रुपये ही संगणकातील तांत्रिक अडचणींमुळे चुकीची असल्याचे 'एलआयसी'ने तक्रारदारांना कळविले होते. 'एलआयसी' ही सेवा सदोष असल्याने उर्वरित रक्कम, त्यावरील व्याज, नुकसान भरपाई आणि तक्रार खर्च मंजूर करण्याची मागणी करणारी तक्रार दाखल करण्यात आली होती.

**'एलआयसी' विरोधात तक्रार करण्याची अधिकार नाही**

तक्रारदारांना कळविण्यात आलेली रक्कम त्यांना मुळातच विम्याप्रमाणे देता येत नाही. त्यामुळे त्यांना विमा कंपनीविरोधात विरुद्ध तक्रार करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे त्यांची तक्रार खर्चासह फेटाळण्यात यावी अशी विनंती 'एलआयसी'ने केली होती. तक्रारदार यांना त्यांनी मागणी केल्याप्रकरणी रक्कम देणे शक्य नसले तरी ते नुकसान भरपाईसाठी पात्र आहेत, असा निकाल आयोगाने दिला आहे.

# रिंग रोडबाधित इंदोरीतील शेतकऱ्यांना सुमारे दीडपट मोबदला देण्याचा निर्णय

तळेगाव दाभाडे पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या नियोजित रिंग रोडमध्ये बाधित होत असलेल्या मावळ तालुक्यातील इंदोरी येथील शेतकऱ्यांना सुमारे दीडपट मोबदला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अतिरिक्त ६८ कोटी रुपयांची नुकसान भरपाई मिळणार असल्यामुळे शेतकऱ्यांकडून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

आमदार सुनील शेळके यांच्या निवासस्थानी इंदोरीच्या शेतकऱ्यांबरोबर झालेल्या बैठकीत पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार व जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी संपादित जमिनींचा अतिरिक्त मोबदला देण्याचा शब्द शेतकऱ्यांना दिला होता. त्या संदर्भातील आदेश काढण्यात आला आहे.यापूर्वी इंदोरीतील शेतकऱ्यांना प्रतिगुंठा ७



लाख १७ हजार रुपयांचा मोबदला जाहीर करण्यात आला होता. त्यात वाढ करून आता प्रतिगुंठा ९ लाख ८७ हजार रुपये मोबदला देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना एकूण ६८ कोटी रुपयांचा अधिक मोबदला प्राप्त होणार आहे. उपविभागीय (प्रांत) अधिकारी सर्व संबंधित जमीन मालक शेतकऱ्यांना नव्या मोबदल्याबाबत उल्लेख असलेल्या नोटीस बजावून त्यांच्याकडून त्यासाठी संमती पत्र घेऊन या नव्या निर्णयाची अंमलबजावणी करतील, तसेच इंदोरीच्या शेतकऱ्यांना न्याय मिळण्याबरोबरच रिंग रोडच्या भूसंपादनाचे काम मार्गी लागून त्या कामास गती प्राप्त होईल, असे शेळके यांनी सांगितले.

शासनाकडून यापूर्वी जाहीर करण्यात आलेला संपादित जमिनीचा मोबदला अपुरा असल्यामुळे तो वाढवून मिळण्याबाबत आम्ही आमदार सुनील शेळके यांच्याकडे मागणी केली होती. त्याचा प्रशासनाकडे व राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून आमदारांनी आम्हाला न्याय मिळवून दिला. त्याबद्दल आम्ही आमदार शेळके तसेच विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना धन्यवाद देतो. गणेशोत्सवात आम्हाला मिळालेला हा गणपती बाप्पाचा प्रसादच आहे, अशी प्रतिक्रिया इंदोरीच्या शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली.

# पत्नीशी अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून झाला 'त्या' व्यक्तीचा खून; आरोपीला बारा तासांत बीड मधून अटक

पुणे । प्रतिनिधी

पत्नीशी अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून एकाने सोबत काम (थरज्ञरव)करणाऱ्या पेंटरचा सिमेंटच्या गट्टूने ठेचून खून केला. ही घटना मंगळवारी (दि. १०) सकाळी साडेआठच्या सुमारास काळेवाडी फाटा ते तापकीर चौक रस्त्यावरील धनगरबाबा मंदिराजवळ उघडकीस आली. दरम्यान वाकड पोलिसांनी अवघ्या बारा तासात आरोपीला बीड येथून बेड्या ठोकल्या आहेत.

बाळु विठ्ठल साळवे (वय ३२, रा. श्रीनगर कॉलनी, रहाटणी. मुळ रा. केसापुरी, माजलगाव, बीड) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. अली अन्सारी (वय ३५) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.


वरिष्ठ पोलीस निरीक्षक निवृत्ती कोल्हटकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळी काळेवाडी फाटा ते तापकीर चौक रस्त्यावरील धनगरबाबा मंदिराजवळ अंदाजे ३५ वर्षे वयाचा पुरुष बेशुध्द अवस्थेत पडल्याची माहिती वाकड पोलिसांना मिळाली. पोलीस घटनास्थळी पोहचले असता त्यांना रक्ताच्या थारोळ्यात एक मृतदेह असल्याचे दिसून आले. पोलिसांनी परिसरात चौकशी करून अली अन्सारी याची ओळख पटवली. तसेच, तो पेंटर असल्याचे पोलिसांना समजले.

दरम्यान, गुन्हा उघडकीस आणण्यासाठी तपास पथकातील अधिकारी, अंमलदार यांची दोन पथके तयार करण्यात आली. दोन्ही पथकांनी अज्ञात आरोपीचा शोध सुरु केला. प्रत्यक्ष साक्षिदार, घटनास्थळ आणि आजुबाजूच्या सीसीटीव्ही आणि गोपनीय माहितीच्या आधारे अली अन्सारी याच्या सोबत काम करणारा बाळु साळवे (रा. रहाटणी फाटा) याने हा खून केल्याचे समोर आले. त्यानुसार, पोलिसांनी रहाटणी परिसर पिंजून काढत आरोपीचे घर शोधून काढले. आरोपीच्या पत्नीकडे पोलिसांनी विचारपूस केली असता तिने आपला पती घरी आलाच नसल्याचे सांगितले. त्यानंतर तांत्रिक माहितीच्या आधारे बाळू साळवे हा त्याच्या मुळ गावी गेल्याची माहिती पुढे आली. त्यानुसार, एका पथकाने थेट बीड गाठले. मूळ गावातून आरोपीला ताब्यात घेतले. मृत अली अन्सारी आणि आरोपी बाळु साळवे सुमारे एक वर्षापासून सोबत पेंटिंगचे काम करीत होते. त्यांचे एकमेकांच्या घरी जाणे-येणे होते. आरोपी बाळू याची पत्नी आणि मृत अली अन्सारी याच्यात अनैतिक संबंध असल्याचा संशय बाळू याला होता. या संशयावरुन त्याने सिमेंटच्या गट्टूने ठेचून अन्सारी याचा खून केला.

# सद्गुरू नारायण महाराज अनंतात विलीन

**सासवड । प्रतिनिधी**

विश्वचैतन्य सद्गुरू नारायण महाराज (आण्णा) यांचे सोमवारी (दि.९) सायंकाळी दीर्घ आजाराने निधन झाले. मंगळवारी त्यांच्या पार्थिवावर नारायणपूर (ता. पुरंदर) येथील यज्ञकुंडाजवळ



सायंकाळी ५ वाजता अग्निसंस्कार करण्यात आले. यावेळी माजी कृषिमंत्री शरद पवार, शिक्षणतज्ज्ञ डॉ. शां. ब. मुजुमदार, खा. सुप्रिया सुळे, माजी खासदार अशोक मोहोळ, आमदार संजय जगताप, आमदार भीमराव तापकीर, आमदार संग्राम थोपटे, माजी राज्यमंत्री विजय शिवतारे, माजी सनदी अधिकारी संभाजी झेंडे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे, आध्यात्मिक क्रांतिवीर संघटनेचे अध्यक्ष ह.भ.प अक्षयमहाराज भोसले, जालिंदर कामठे, उल्हास पवार, विजय कोलते आदी उपस्थित होते.

# सिद्धार्थ शिरोळे यांना महाराष्ट्र विधानसभा 'उत्कृष्ट भाषण' पुरस्कार प्रदान

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आमदार सिद्धार्थ शिरोळे यांना 'उत्कृष्ट भाषण' पुरस्कार आज प्रदान करण्यात आला. मुंबई येथील विधानभवनामधील मध्यवर्ती सभागृहात आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान सोहळा पार पडला. राज्य सरकारच्या राष्ट्रकुल संसदिय मंडळाच्या वतीने २०२१-२२ या वर्षातील उत्कृष्ट भाषण पुरस्कारासाठी शिरोळे यांची निवड करण्यात आली होती.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील,




विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ आणि विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

सिद्धार्थ शिरोळे यांनी विधानसभेत छत्रपती शिवाजीनगर मतदार संघातील विविध प्रश्न मांडत असतांनाच राज्यातीलही अनेक विषय सभागृहात प्रभावीपणे मांडले होते. समस्या मांडत असतांनाच त्या सोडवण्यासाठीच्या सूचना करीत सभागृहात छाप पाडणार्या शिरोळे यांना उत्कृष्ट भाषण' पुरस्कार प्रदान करीत गौरवण्यात आले. सिद्धार्थ शिरोळे यांनी विद्यापीठ चौकातील वाहतूक कोंडी, खडकी कॅन्टोनमेंटचा महापालिका हद्दीत समावेश, नदीतील जलपर्णी, मराठा आरक्षण, मतदार संघातील पूरग्रस्त वसाहती यांसोबतच इतर अनेक सभागृहात प्रभावी मांडणी केली.

# लिव्ह इनमध्ये राहणाऱ्या प्रियकराने केली प्रेयसीचा हत्या

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

ऐन गणेशोत्सवात पिंपरी- चिंचवडमध्ये तीन दिवसांत दुसरी हत्या झाली आहे. आता लिव्ह इन मध्ये राहणाऱ्या प्रेयसीची घरात हत्या करून, तिचा मृतदेह रिक्षात ठेवून प्रियकर गायब झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ही घटना काल रात्री बारा ते पहाटे तीन या दरम्यान घडली असून, सकाळी ती उघडकीस आली आहे. शिवानी सुपेकर असं हत्या झालेल्या महिलेचे नाव आहे. विवाहानंतर शिवानीचे पती सोबत खटके उडाले होते, त्यानंतर रिक्षाचालक विनायक आवळे सोबत तिचे प्रेम संबंध जुळले.

गेली दोन वर्षे दोघे लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहू लागले. मंगळवारी रात्री या दोघांमध्ये किरकोळ वाद झाले. याच रागातून विनायकने शिवानीचा गळा आळवून हत्या केली. मग, मृतदेह रिक्षात ठेवून तिच्या आईच्या घरासमोर रिक्षा लावली आणि तो पसार झाला. काहींना आज सकाळी रिक्षात शिवानी बसल्याचं दिसलं, पुढं ती मृत पावल्याचं लक्षात आलं. वाकड पोलिसांनी अधिकचा तपास सुरू केला आहे. ही हत्या प्रियकर विनायकने केल्याच्या निष्कर्षापर्यंत पोलीस पोहचलेली आहे. त्याचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे. दोन दिवसांपूर्वी वाकड पोलीस स्टेशनच्या हद्दीतच अली अन्सारीची दगडाने ठेचून हत्या झाली होती. आता या महिलेचा गळा घोटण्यात आला. त्यामुळं ऐन गणेशोत्सवात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# समाविष्ट गावांमधील शास्तीकर माफ करावा

**पुणे । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या धर्तीवर पुणे महापालिका हद्दीतील नव्याने समाविष्ट ३४ गावांमधील शास्तीकर माफ करण्यात यावा अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे करण्यात आली आहे.

राज्य शासनाकडून या गावांमधील शास्तीकर वसुलीस स्थगिती दिली असली तरी महापालिकेकडून गावातील नागरिकांना कर भरण्यासाठी फोन केले जात आहेत. या




गावांमध्ये ना विकास आराखडा आहे ना महापालिकेच्या सुविधा, ही बाब लक्षात घेऊन शास्तीकर माफ केला जावा, अशी मागणी माजी विरोधीपक्ष नेते उज्वल केसकर, सुहास कुलकर्णी तसेच माजी नगरसेवक प्रशांत बधे यांनी केली आहे. या निवेदनानुसार, महापालिकेत समाविष्ट गावांची अवस्था भिषण आहे, २०१७ मध्ये समाविष्ट झालेल्या गावांचा आराखडा अद्यापही तयार झालेला नाही, २०२१ मध्ये समाविष्ट झालेल्या २३ गावांची जबाबदरी पालिकेकडे असून त्याचा आराखडा पीएमआरडीए करत आहे. त्यामुळे गावांमधे मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे असून त्यांना कायद्यातील तरतूदीनुसार दुप्पट शास्तीकर लावण्यात आला आहे. यावर मासिक दोन टक्के दंड आकारला जात आहे. त्याच वेळी पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत या करास माफी देण्यात आली आहे. त्यामुळे, विधानसभा निवडणूका पाहता तातडीने हा शास्तीकर माफ करावा अशी मागणी करण्यात आली आहे.